**मे. मिलीयन स्टील्स प्रा. लि. प्लॉट नं. १४१७-अ, देशपांडे लेआऊट, वर्धमान नगर, नागपूर यांच्या स. नं. ४०१/१, ४०१/२ आणि ५३०, मौजा मुर्सा, ता. भद्रावती आणि स. नं. ३७९, ३८०, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८९/१, ३८९/२, ३९०, ३९१, ३९२ आणि ३९३, मौजा बेलसनी, ता. जि. चंद्रपूर येथे त्यांच्या प्रस्तावित स्पॉंज आयर्नच्या २,३१,००० टन प्रति वर्ष उत्पादना करिता २ X ३५० टन प्रति दिन डीआरआय किल्न, २,६४,००० टन प्रति वर्ष बिलेट्सच्या उत्पादनाकरिता स्टिल मेल्टिंग शॉप (४x२० प्रवर्तन भट्टी, १x२५ टन लॅडल रिफानिंग फर्नेस, कन्टीन्यूज कास्टींग मशीन ६x११ मीटरचे ४ स्टँड आणि १,३२,००० टन प्रतिवर्ष रोल्ड उत्पादन (टीएमटी बार्स आणि वायर्स) आणि १,३२,००० टन प्रतिवर्ष चे लाईट वेट (एंगल, बिम, चॅनल) उत्पादन करण्याकरिता २० टन प्रति तास ची रोलिंग मिलची स्थापना तसेच ३० मेगावॅट पॉवर प्लांट (२० मेगावॅट डब्ल्युएचआरबी व १० मेगावॅट एएफबीसी) प्रकल्प उभारण्याच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३०/०५/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | स. नं. ३७९, ३८०, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८९/१, ३८९/२, ३९०, ३९१, ३९२ आणि ३९३, मौजा बेलसनी, ता. जि. चंद्रपूर. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. मिलीयन स्टील्स प्रा. लि. प्लॉट नं. १४१७-अ, देशपांडे लेआऊट, वर्धमान नगर, नागपूर यांच्या स. नं. ४०१/१, ४०१/२ आणि ५३०, मौजा मुर्सा, ता. भद्रावती आणि स. नं. ३७९, ३८०, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८९/१, ३८९/२, ३९०, ३९१, ३९२ आणि ३९३, मौजा बेलसनी, ता. जि. चंद्रपूर येथे त्यांच्या प्रस्तावित स्पॉंज आयर्नच्या २,३१,००० टन प्रति वर्ष उत्पादना करिता २ X ३५० टन प्रति दिन डीआरआय किल्न, २,६४,००० टन प्रति वर्ष बिलेट्सच्या उत्पादनाकरिता स्टिल मेल्टिंग शॉप (४x२० प्रवर्तन भट्टी, १x२५ टन लॅडल रिफानिंग फर्नेस, कन्टीन्यूज कास्टींग मशीन ६x११ मीटरचे ४ स्टँड आणि १,३२,००० टन प्रतिवर्ष रोल्ड उत्पादन (टीएमटी बार्स आणि वायर्स) आणि १,३२,००० टन प्रतिवर्ष चे लाईट वेट (एंगल, बिम, चॅनल) उत्पादन करण्याकरिता २० टन प्रति तास ची रोलिंग मिलची स्थापना तसेच ३० मेगावॅट पॉवर प्लांट (२० मेगावॅट डब्ल्युएचआरबी व १० मेगावॅट एएफबीसी) प्रकल्प उभारण्याच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-३ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. मिलीयन स्टील्स प्रा. लि. प्लॉट नं. १४१७-अ, देशपांडे लेआऊट, वर्धमान नगर, नागपूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २७/०१/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३० मे, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र नवराष्ट्र, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द हितवाद, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २६/०४/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, व्हीसीए समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१०. नगर परिषद कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
११. ग्रामपंचायत कार्यालय, सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, बेलसनी, ता. जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, शेणगांव, ता. जि. चंद्रपूर.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, येरूर, ता. जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, ताडाली, ता. जि. चंद्रपूर.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, ऊसगांव, ता. जि. चंद्रपूर.
१८. ग्रामपंचायत कार्यालय, वढा, ता. जि. चंद्रपूर.
१९. ग्रामपंचायत कार्यालय, मुर्सा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
२०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २० वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३७/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५०५१५-एफटीएस-०११६ दिनांक १५/०५/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

१) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर - **सदस्य**

३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर - **समन्वयक**

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ३० सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. नितीन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. संजय दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-**

१) <u>श्री. दिपक भारतसिंग दिक्षीत, अध्यक्ष, प्रकृती फाऊंडेशन, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने १.२ परिशिष्टामध्ये साहित्याच्या चोरीबाबत कागदपत्र सादर केले आहे. त्याबाबत खुलासा सादर करण्यात यावा. कंपनीने १०.७ – पर्यावरण व्यवस्थापनमध्ये सर्व तज्ञ लोकांची यादी जोडलेली आहे. त्यामध्ये तज्ञ व्यक्तिंनी या परिसरातील वायु, जल व ध्वनीचे परिक्षण केले आहे. त्याचे अहवाल सोबत जोडले आहेत. त्याबाबत माहिती देण्यात यावी. आपण जोडलेली कागदपत्रे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जोडणे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या नियमाप्रमाणे जोडणे बंधनकारक आहे काय? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, त्यांनी Plagarism software विकत घेतलेला असून त्यामध्ये सदर अहवाल चालविण्यात आला आहे. त्यामध्ये निर्माण झालेल्या अहवालाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या नियमानूसार सदर अहवाल पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासांबत जोडणे बंधनकारक आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये घोषणापत्र सोबत जोडावे लागते. वायु, जल व ध्वनी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिंची त्यांचे संपर्क क्रमांक व नाबेट प्रमाणपत्रासह यादी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जोडणे बंधनकारक आहे. |
| २) | या कंपनीने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जोडलेली कागदपत्रानूसार मे. ग्रेटा एनर्जी लि. या उद्योगाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खरा की खोटा असा माझा मा. अध्यक्षांना प्रश्न आहे. मे. ग्रेटा एनर्जी लि या उद्योगाची जनसुनावणी दि. २८/०५/२०२५ रोजी जनसुनावणीदरम्यान मा. अध्यक्ष व प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांच्या लक्षात आणून दिले की सदर प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खोटा आहे. त्या मुद्याची जाणीव घेता मे. ग्रेटा एनर्जी लि. या उद्योगाची जनसुनावणी तहकूब करण्यात यावी व पर्यावरण सल्लागारांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. मा. अध्यक्षांनी त्याविषयी कोणतीच कार्यवाही केली नाही, फक्त नोंद घेण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नूसार जिल्हाधिकारी यांना [illegible] | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आले आहे. सनदी अधिकाऱ्यांनी जनसुनावणी दरम्यन उपस्थित मुद्यांचा निर्वाळा करण्याचे अधिकार आहेत. जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांची नोंद घेणे हे लघुलेखकाचे काम आहे. जनसुनवणीकरिता उपस्थित अधिकाऱ्यांनी जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांवर तोडगा काढावा व त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. जर खोट्या अहवालांवर अधिकारी कार्यवाही करत नसतील तर त्यांचा देखील खोट्या गोष्टींमध्ये सहभाग असल्याचे सिद्ध होते. अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारांचा चांगल्या गोष्टींसाठी उपयोग करावा. मे. ग्रेटा एनर्जी लि. या प्रकल्पाविरोधात भद्रावती पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच मा. उच्च न्यायालयामध्ये देखील जनहित याचिका दाखल करण्यात येईल व त्यामध्ये मा. जिल्हाधिकारी यांना देखील प्रतिवादी बनविण्यात येईल. | |
| ३) | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील ४.५.११, पान क्रं. १५-४ मध्ये एअरोमोड सॉफ्टवेअरचा वापर केल्याचे दर्शविण्यात आले आहे. या सॉफ्टवेअरचे वैध प्रमाणपत्र पर्यावरण सल्लागार यांच्याकडे आहे काय? वैध प्रमाणपत्राची प्रत असल्यास त्याची प्रत दाखविण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर प्रमाणपत्राची प्रत आमच्या नागपूर येथील कार्यालयात उपलब्ध आहे. आपल्याला त्याची प्रत देण्यात येईल. |
| ४) | साहित्याच्या चोरीबाबतचा अहवाल पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये जोडण्यात आला आहे. सदर अहवालानूसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल ८०९७४ शब्दांचा असून त्याचा साहित्याच्या चोरीबाबतचा अहवाल फक्त १४ टक्क्यांचा आहे. परंतु आम्ही जेव्हा सॉफ्टवेअरमध्ये तपासले तेव्हा त्याबाबतचा अहवाल ५० टक्क्यांपेक्षा जास्त आला आहे. कंपनीच्या अहवालानूसार १४ टक्के व आमच्या अहवालानूसार ५० टक्क्यांची तफावत आहे म्हणजेच सदर अहवालामध्ये फेरफार करण्यात आलेला आहे. पर्यावरण सल्लागार हे या विषयाचे तज्ञ असल्याने त्यांना याबाबत पूर्ण माहिती असणे अपेक्षित आहे. पर्यावरण सल्लगार यांनी सादर | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर अहवालामध्ये म.प्र.नि. मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ सारख्या बऱ्याच समान शब्दांचा वापर करण्यात येतो. तसेच सेकंडरी डाटा वारंवार वापरण्यात येतो. ज्याप्रमाणे ५० टक्क्यांपर्यंत आपला अहवाल आला त्यानूसार त्यामध्ये सेकंडरी डाटाचा देखील उल्लेख असेल. सदर सॉफ्टवेअर वारंवार असलेले शब्द मोजत नाही. कदाचित आपल्या सॉफ्टवेअरने वारंवार आलेल्या शब्दांना मोजले असेल. तसेच प्रत्येक सॉफ्टवेअर वेगवेगळ्या पद्धतीने कार्य करते. त्यानूसार आपला ५० टक्क्यांचा अहवाल आला असावा. |

| | | |
|---|---|---|
| | केलेला अहवाल १०० टक्के बरोबर आहे काय? माझा असा आरोप आहे की, पर्यावरण सल्लागाराने सदर अहवाल प्रोटेक्ट करून प्लॅगॅरिज्म मध्ये चालवला असल्याने आपण जेव्हा प्लॅगॅरिज्म सॉफ्टवेअर मध्ये चालविला तेव्हा त्यामध्ये शब्दांची व पानांची संख्या आली परंतु किती वेळा शब्द वापरण्यात आला ते आले नाही. त्यामुळे आमचा ५० टक्के अहवाल आला व आपला १४ टक्के आला. त्यामुळे माझा आरोप आहे की हा अहवाल खोटा आहे व मा. अध्यक्ष यांनी याची चौकशी करावी. खोट्या अहवालाबाबत म.प्र.नि. मंडळाने आपल्या लक्षात आणून दिले पाहिजे. सदर खोट्या अहवालावर आमचा आक्षेप आहे. कंपनीने खोटा अहवाल तयार करून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिवांना सादर केले. त्यांनी त्यास मान्यता दिली व प्रादेशिक अधिकारी चंद्रपूर यांनी जनसुनावणी आयोजित केली. त्यांनी आपली दिशाभूल केली. याबाबत म.प्र.नि. मंडळाला यातील तांत्रिक बाबींबाबत माहिती आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबतच्या तांत्रिक बाबी म.प्र.नि. मंडळाने मा. अध्यक्षांच्या लक्षात आणून दिल्या नाहीत. त्यामुळे आम्ही आपणावर आरोप करत आहोत. याबाबत आपण काय निर्णय देणार याची माहिती द्यावी. मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेचे अवलोकन करावे. म.प्र.नि. मंडळाने पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनूसार मा. अध्यक्षांना असलेल्या अधिकारांबाबत अवगत करायला हवे. सदर अधिसूचनेनूसार मा. अध्यक्षांना निर्णय देण्याचे अधिकार आहेत. आमच्यवर अन्याय करू नका. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांना प्रश्न आहे की त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेमध्ये नमूद असलेले अधिकार त्यांनी मा. अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले काय? माझी म.प्र.नि. मंडळाला विनंती आहे की त्यांनी मा. जिल्हाधिकारी यांची दिशाभूल करू नये. माझी विनंती आहे की, मा. जिल्हाधिकारी यांनी मी उपस्थित | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे व जनसुनावणीचे ईतिवृत्त मंत्रालयाकडे सादर करण्यात येईल.<br><br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांची ईतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येते व पुढील निर्णयासाठी मंत्रालयाकडे सादर करण्यात येते.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण आपले मत सांगावे. जनसुनावणी समितीला निर्णय घेण्याचा अधिकार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | केलेल्या मुद्यांची गंभीरतेने दक्षता घ्यावी. आमचा कोणत्याही प्रकल्पाला विरोध नाही. परंतु प्रकल्प राबविताना नियमांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांनी जाहीर करावे की त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नाही व त्याची नोंद ईतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात यावी. | |
| ५) | चॅप्टर क्रं. ७ मध्ये जोखीम मुल्यांकनाबाबत माहिती दिली आहे. त्याच्या सॉफ्टवेअरचे नांव सांगावे. सदर सॉफ्टवेअरचे कायदेशीर प्रमाणपत्र पर्यावरण सल्लागार यांचेकडे आहे काय, असल्यास प्रमाणपत्र देण्यात यावे. सदर सॉफ्टवेअरचे प्रमाणपत्र उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ यांचेकडे सादर करण्यात यावे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, जोखीम मुल्यांकन अलुवा सॉफ्टवेअरद्वारे करण्यात आले आहे. सदर सॉफ्टवेअरचे कायदेशीर प्रमाणपत्र आमच्याकडे आहे. |
| ६) | प्रकल्पामध्ये औद्योगिक वापराकरिता वर्धा नदीतून पाणी वापरण्यात येणार असल्याचे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नमूद आहे. सदर पाणी थेट बॉयलरमध्ये वापरण्यात येणार किंवा कसे याबाबत माहिती द्यावी. सदर पाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता कोणत्या रसायनांचा वापर करण्यात येणार आहे? रसायनांची साठवणूक कंपनीला करावी लागणार. बॉयलर चालविण्याकरिता क्लोरिन, एसडीओ, एलडीओची साठवणूक करावी लागणार की नाही? याबाबत अहवालामध्ये कुठेही नमूद करण्यात आले नाही. रसायनांची व्यवस्थित साठवणूक न केल्यामुळे परिसरात भीषण अपघात घडु शकतो. मा. जिल्हाधिकरी यांना महाराष्ट्रामधून सर्वात चांगले काम केल्याबाबत पुरस्कार देण्यात येतो व त्यांच्याच समक्ष असे खोटे अहवाल सादर केले जातात. आपण सॉफ्टवेअरचा वापर केलेलाच नाही. पर्यावरण सल्लगाराने चॅप्टर ७ खोटा सादर केलेला आहे. कारण येथे नागरीकांना तांत्रिक गोष्टींची माहिती नाही. सदर पाण्यावर प्रक्रिया करताना त्यामध्ये क्लोरिन व लिक्विड सिलीका मिसळण्यात येईल. परंतु हे रसायन साठवणूक करण्याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये आपणाकडून कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही असा माझा आक्षेप आहे. जर | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सर्वप्रथम पाणी तळ्यामध्ये साठवले जाणार व आवश्यकतेप्रमाणे डीएम प्लांटमध्ये प्रक्रिया करून औद्योगिक प्रक्रियेमध्ये वापरण्यात येईल. सदर पाण्यातील हार्डनेस, टीडीएसची मात्रा केमिस्टतर्फे तपासण्यात येईल व त्यानंतर त्यामध्ये रसायनांचा वापर करून औद्योगिक प्रक्रियेमध्ये वापरण्यात येईल. सॉफ्टवेअरचा वापर करून सदर अहवाल तयार करण्यात आला आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपयांचा समावेश पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात येईल. डायरेक्टर ऑफ बॉयलर यांच्याकडून अनुमती मिळाल्यानंतरच सदर प्रकल्पात बॉयलर चालवण्यात येईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर देखील वेळोवेळी बॉलरची तपासणी केली जाते. बॉयलर स्फोट होण्याच्या घटना फार कमी प्रमाणात घडतात. त्याची शक्यता नाहीच्या प्रमाणात असते. आपल्या आक्षेपानूसार क्लोरिन गॅसची मोठ्या प्रमाणत जेस की किलोलिटर मध्ये साठवणूक |

| | | |
|---|---|---|
| | तुम्ही कायदेशीर सॉफ्टवेअरचा वापर केला असता तर त्यामध्ये या सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला असता. जर क्लोरिन गॅसचा स्फोट झाला तर त्याचे कार्य परिणाम होतील याचा विचार करायला पाहिजे. आपल्या अहवालामध्ये क्लोरिन, लिफिवड फार्मा सिलीका, फॉस्फोरिक ॲसिडच्या व अमोनिया गॅसच्या साठवणूकीबाबत कोणतीही माहिती नमूद नाही. आपण जो आराखडा सादर केला त्यामध्ये देखील याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या रसायनांपैकी एकही रसायनाची गळती झाली तर त्यामुळे सर्व रसायनांचा स्फोट होईल व त्यामुळे मोठ्या जिवीत हानी होईल. याचा समावेश जोखीम मुल्यांकन अहवालामध्ये करण्यात आलेला नाही. आपण या गोष्टींचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समावेश का नाही केला. ज्या गोष्टींची गरज आहे त्या गोष्टींचा समावेश पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये करण्यात आलेला नाही. बॉयलरमध्ये वापरण्यात येणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्यात येईल व सदर पाण्याचा प्रक्रियेमध्ये पुनर्वापर करण्यात येईल. पाण्याच्या साठवणूकीबाबत करण्यात येणाऱ्या तरतूदींबाबत कुठेही नमूद करण्यात आले नाही. प्रकल्प प्रवर्तकांना वीज निर्मीती करताना उपरोक्त रसायनांची मोठ्या प्रमाणात साठवणूक करावी लागेल. त्यामुळे माझे असे मत आहे की सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खोटा आहे. मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण सल्लागारांना उत्तर देण्याचे आदेश द्यावे. जर या रसायनांची गळती झाली तर जवळपासच्या नागरीकांवर याचा विपरित परिणाम होईल. माझा आरोप आहे की कंपनीचा प्लॅगफरिज्म अहवाल व चॅप्टर क्रं. ७ पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये खोटा सादर करण्यात आला आहे. याबाबत मा. अध्यक्षांनी कायदेशीर कारवाई करावी. | करावयाचे असेल तर त्यामध्ये स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु या प्रकल्पामध्ये क्लोरिन व इतर रसायनाची साठवणूक खूप कमी प्रमाणात करण्यात येणार आहे त्यामुळे जिवीत हानी होण्याची शक्यता नगण्य प्रमाणात आहे. सदर रसायन प्रयोगशाळेमध्ये उपयोगात येईल त्यामुळे हे हानिकारक नाही. यामध्ये जोखीमीचे प्रमाण फार कमी राहणार आहे. तरी देखील याबाबत जोखीम मुल्यांकन करून योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. आम्ही हे सर्व आरपीएल वर आधारित सुत्राच्या आधारे चॅप्टर क्र. ७ मध्ये माहिती तयार केली आहे. चॅप्टर ७ मध्ये सर्व नमूद करण्यात आले आहे. सदर अहवाल प्रारूप अहवाल असतो. जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेले त्रुटी, मुद्दे व आक्षेप याबाबत अहवाल तयार करून अंतिम अहवाल समावेश केला जातो. अंतिम अहवालामध्ये आपण केलेल्या सूचनांचा समावेश करण्यात येईल. |
| ७) | चॅप्टर क्रं.२ च्या १८.१० नूसार सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्यात येणार आहे काय? बसविणार असल्यास त्याच्या क्षमतेची माहिती देण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेचे डिझाईन व माहिती आपणांस देण्यात येईल. सदर प्लानमध्ये |

| | | |
|---|---|---|
| | आपण सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये त्याचा उल्लेख करण्यात आला नाही त्यामुळे असे निदर्शनास येते की आपण सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविणार नाही. जर आपण बसविणार असते तर त्याबाबतची संपूर्ण तांत्रित माहिती आपण दिली असती. पान क्रं. ११.२ मध्ये आपण आपल्या उद्योगाचा नकाशा दिलेला आहे. आपण दिलेल्या प्लान मध्ये सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेचा उल्लेख केलेला नाही तर आपण लावणार कुठे याची माहिती देण्यात यावी. मा. अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की पर्यावरण सल्लागार यांना सदर प्रश्नाचे उत्तर देण्याचे आदेश द्यावे कारण पर्यावरण सल्लगार आपली दिशाभूल करत आहेत. मा. अध्यक्ष यांना विनंती आहे की आजची जनसुनावणी तहकूब करण्यात यावी व सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील त्रुटींची पूर्तता करून सदर जनसुनावणी परत घेण्यात यावी. मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ चे अवलोकन करावे. त्यामध्ये जनसुनावणी तहकूब करण्याचे अधिकारी मा. जिल्हाधिकारी यांना असल्याचे नमूद आहे. पर्यावरण सल्लागाराने सादर केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा खोटा आहे व त्याचे पुरावे मी जनसुनावणीदरम्यान देत आहे. मागील जनसुनावणीमध्ये प्रकल्प प्रवर्तकांनी आवश्यक अहवाल जोडले नव्हते परंतु या प्रकल्पाच्या अहवालामध्ये जोडलेले प्रमाणपत्र बोगस असल्याचे मी सिद्ध करत आहे. | सुधारणा करून औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा कुठे लावणार आहे याची माहिती टाकण्यात येईल. सदर प्रकल्पामध्ये औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात येणार आहे. प्रकल्पक्षेत्रामध्ये एका विशिष्ट ठिकाणी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणी तहकूब करण्याचे अधिकार नाहीत. आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे. |
| ८) | सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेचा तक्ता आपण सादर केलेला आहे. तक्ता क्र. २ मध्ये सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेच्या देखभाल दुरूस्तीसाठी वार्षिक रू. २४.० लक्षची तरतूद केल्याचे नमूद आहे. सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा चालविण्याकरिता ०३ शिफ्ट मध्ये किती मनुष्यबळाची आवश्यकता असते याची माहिती देण्यात यावी. वार्षिक रू. २४ लक्ष म्हणजेच महिन्याला रू. २.० लक्ष इतका खर्च दाखविलेला | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद दर कसे वाढवता येतील याबाबत विचार केला जाईल. तसेच सदर अहवालामध्ये प्रकल्प सुरू होण्यापूर्वीचा अंदाजित खर्च नमूद केलेला असतो. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर त्यामध्ये योग्य ती वाढ करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा २४ तास चालविण्याकरिता एकूण १६ माणसांची गरज असणार आहे. रू. २.० लक्ष प्रति महिनानूसार दिवसाला रू. ६६६६/- इतका खर्च येणार आहे. १६ व्यक्तिंच्या दिवसाच्या वेतनाचा हिशोब केला तर प्रति व्यक्ति रू. ४१६/- प्रतिदिन इतका येईल. सदर दर कामगार कायद्याच्या दिलेल्या दरापेक्षा फार कमी आहे. सदर अहवालामध्ये सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेच्या देखभाल व दुरूस्तीबाबत तरतूद करण्यात आलेला खर्च खोटा दाखविण्यात आला आहे. माझी विनंती आहे की ईतिवृत्तामध्ये याची नोंद घेण्यात यावी. | |
| ९) | सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये पर्यावरण सल्लागार यांनी निलावार लेबॉरेटरीजकडून प्राप्त अहवाल जोडलेले आहेत. पर्यावरण सल्लागार यांनी मे. निलावार लेबॉरेटरीज यांना काम दिलेले आहे. सदर प्रयोगशाळेकडे राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (NABL) च्या संपूर्ण मानकांची तपासणी करण्याची व्याप्ती आहे काय? सदर प्रयोगशाळेकडे राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (NABL) च्या संपूर्ण मानकांची तपासणी करण्याची व्याप्ती नाही. याबाबत मी स्वत: राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (NABL) मध्ये चौकशी केली आहे. पूर्ण व्याप्ती असल्यास त्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. जर निलावार लॅबॉरेटरीजने पूर्ण व्याप्ती नसताना अहवाल दिला तर तो अहवाल अवैध मानला जाईल. त्यामुळे आपण सादर केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील पूर्ण माहिती खोटी ठरते. मे. निलावर लॅबॉरेटरीजने त्यांच्याकडे व्याप्ती नसताना पृथ:करण अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे सदर पृथ:करण अहवाल बेकायदेशीर ठरते. याप्रकारे स्थानिकांची फसवणूक करण्यात येत आहे. पर्यावरण सल्लागार यांनी प्लॅगॅरिज्म मध्ये काही तांत्रिक बाबींची छेडछाड करून प्लॅगॅरिज्म अहवाल १४ टक्क्यांवर आणला आहे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, मे. निलावार लॅबॉरेटरीजकडे राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (NABL) च्या संपूर्ण मानकांची तपासणी करण्याची व्याप्ती आहे. मे. निलावार लॅबॉरेटरीजचा त्रयस्त प्रयोगशाळेसोबत सामंजस्य करार आहे. त्यांच्याकडून उर्वरित मानकांचे अहवाल प्राप्त केले जातात.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे. सदर जनसुनावणीचे ईतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येतील व पुढील निर्णय घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | सदर कंपनी खोटा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करून स्थानिक नागरीकांची फसवणूक करत आहे व त्यावर आपण जनसुनावणी आयोजित करत आहात तर याबाबत मा. अध्यक्षांचा निर्णय काय आहे? | |
| १०) | पर्यावरण सल्लागार यांनी निलावार लॅबॉरेटरीज द्वारे परिसरातील ०८ गावांमध्ये हवा, जल व ध्वनीचे सर्वेक्षण अहवाल जोडलेले आहेत. म.प्र.नि. मंडळाचे पृथ:करण अहवाल व मे. निलावार लॅबॉरेटरीजद्वारे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये जोडलेले पृथ:करण अहवाल त्यामध्ये नमूद प्रदूषणाची पातळी यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. एकतर म.प्र.नि. मंडळाचे पृथ:करण अहवाल चुकीचा किंवा मे. निलावार लॅबॉरेटरीज यांनी दिलेला अहवाल चुकीचा असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला प्रदूषण निर्माण मंडळा म्हणून संबोधतो, कारण प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पृथ:करण अहवालामध्ये प्रदूषण होत असल्याचे दिसून येते परंतु खाजगी प्रयोगशाळेच्या अहवालांमध्ये या परिसरामध्ये प्रदूषण नगण्य असल्याचे दाखविण्यात येते. माझी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांना विनंती आहे की याबाबत स्पष्टीकरण द्यावे. तसेच मा. अध्यक्ष यांनीदेखील प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून स्पष्टीकरण मागावे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व म.प्र.नि. मंडळ यांच्या सॉफ्टवेअर नूसार अहवाल प्रकाशित होतात. परंतु म.प्र.नि. मंडळाला पृथ:करण अहवालामध्ये असलेली तफावत निदर्शनास आली नाही काय? सदर तफावतीवर म.प्र.नि.मंडळाने कोणती कार्यवाही केली. कार्यवाही न करता म.प्र.नि. मंडळाने मा. अध्यक्षांना खोटी माहिती का दिली? ज्या महिन्यामध्ये पर्यावरण सल्लागार यांनी सर्वेक्षण केले त्याच महिन्यामध्ये म.प्र.नि. मंडळाने देखील सर्वेक्षण केले आहेत. त्याचे अहवाल म.प्र.नि. मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. परंतु तफावत असून देखील म.प्र.नि. मंडळाने | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे व त्याचे ईतिवृत्तामध्ये नमूद करण्यात येणार आहे. तसेच याबाबत मंत्रालयामध्ये उहापोह होणार आहे. अंतिम अहवाल सादर करताना आपण उपस्थित केलेल्या मुद्यांनूसार कंपनीने पूर्तता केली किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात येते.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे. सदर जनसुनावणीचे ईतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येतील व पुढील निर्णय घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | कार्यवाही का केली नाही याबाबतचा खुलासा सादर करण्यात यावा. म.प्र.नि. मंडळाच्या पृथ:करण अहवालानुसार परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते आहे व याबाबत आपल्या डोळ्यात धूळफेक होत आहे. प्रदूषणाचा त्रास परिसरातील संपूर्ण जनतेला होत आहे. | |
| ११) | पान क्रं. २१ मध्ये ४.२ परिसरातील २६ गावातील एकूण लोकसंख्या ६३४१८ दाखविलेली आहे. त्यापैकी फक्त ०४ गावांमध्ये आपण प्रश्नावली दिली व त्या ०४ गावातील नागरीकांकडून प्रकल्प या क्षेत्रात यावा किंवा कसे याबाबत अभिप्राय मागितलेला आहे. सदर प्रश्नावलीची माहिती जनसुनावणीदरम्यान सादर करण्यात यावी. या ठिकाणी सर्व गावातील नागरीक उपस्थित आहेत. त्यांना खरच प्रश्नावली दिली आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. गावकऱ्यांच्या मते आपण प्रश्नावली दिलेली नाही. त्यामुळे आपण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये दिलेली माहिती ही खोटी आहे. तसेच त्याबाबतचे जिओ टॅग्ड छायाचित्र देखील जोडलेले नाहीत. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार परिसरातील किमीन ३० टक्के लोकांकडून प्रकल्पाबाबत अभिप्राय घेणे बंधनकारक आहे. आपण फक्त १०० लोकांकडून अभिप्राय घेतल्याचे दिसून येते. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी या चुकीबाबत मा. अध्यक्षांना अवगत करायला पाहिजे होते. अशा प्रकारच्या चुकांमुळे जनसुनावणी घेणे बेकायदेशीर ठरणार असे प्रादेशिक अधिकारी यांनी मा. अध्यक्षांना अवगत करायला पाहिजे होते. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल देखील प्रादेशिक भाषेमध्ये प्रकाशित करायला पाहिजे होता. स्थानिकांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्याने त्यांना यातले काहीही कळत नाही. प्रश्नावलीबाबतचे जिओ टॅग्ड छायाचित्र उप-प्रादेशिक अधिकारी यांच्याकडे पर्यावरण सल्लागार सादर करतील काय? अहवालामध्ये जोडलेले छायाचित्र प्राथमिक आरोग्य | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, आमच्या सामाजिक-आर्थिक तज्ज्ञांद्वारे गावांमध्ये सर्वेक्षण करण्यात आले आहे व स्थानिकांकडून अभिप्राय देखील घेण्यात आला होता. आमच्या तज्ज्ञांकडून याबाबतची माहिती संकलित करण्यात येईल व आपणांस देण्यात येईल. प्रश्नावलीबाबतचे जिओटॅग्ड छायाचित्र पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जोडले आहेत. वन्यप्राण्यांच्या संवर्धनाबाबतचा निधी संबंधित विभागाद्वारे मान्यता देण्यात येते. सदर निधीची एकमुस्त किंवा वार्षिक तरतूद करण्याबाबत वन विभागाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानूसार करण्यात येते. वन विभागाकडून प्राप्त निर्देशानूसार आवश्यक खर्च करण्यात येईल. सदर खर्च प्रस्तावित आहे. आपण उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत लेखी स्वरूपात उत्तरे देण्यात येतील.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना वन्य प्राणी बाबतच्या माहितीचे तात्काळ अवलोकन करण्यास सांगितले.<br><br>पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, वन्य प्राणीबाबत संबंधित तज्ज्ञ व्यक्तिसोबत चर्चा करून दुरूस्ती करण्यात येईल. तसेच जिओटॅग्ड छायाचित्र आपणांस देण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | केंद्राचे आहेत. आमचा प्रकल्पाला विरोध नाही. परंतु सर्व बाबी कायदेशीररित्या पार पाडाव्यात हीच आमची मागणी आहे. जैव विविधता व वन्यप्राणी संरक्षणाबाबतचा आराखडा पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये जोडलेला आहे. त्यामध्ये आपले म्हणणे आहे की या परिसरात ६ प्रकारच्या प्रजातीचे प्राणी अस्तित्वात असल्याची माहिती आपण जोडलेली आहे. त्यांच्या संवर्धनाकरिता एकूण रू. ३२.० लक्षची तरतूद केलेली आहे. सदर रक्कम एकमुस्त आहे की वार्षिक आहे याची माहिती देण्यात यावी. त्याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद असणे आवश्यक होते. सदर प्रकल्पाच्या ५-७ कि.मी. अंतरावर मोहगाव वन क्षेत्र आहे. सदर वन क्षेत्रात बिबट्या, वाघ, अस्वल, बारासिंघा, कोल्हा व मुंगूस इत्यादी प्रकारचे शेड्युल-१ चे प्राणी आढळतात. तसेच या क्षेत्रामध्ये धोक्यात असलेल्या प्रजातींपैकी वनस्पती देखील उपलब्ध आहेत. त्याबाबत आपल्या अहवालात माहिती उपलब्ध नाही. वन विभागाच्या संकेतस्थळावर व त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांमध्ये याचा उल्लेख आहे. तसेच या क्षेत्रामध्ये मनुष्य व वन्यजीवांमध्ये होणाऱ्या संघर्षाच्या शेकडो घटना घडलेल्या आहेत. आपण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये या सर्व गोष्टींचा समावेश केलेला नाही. त्यामुळे आपण केलेला जोखीम मुल्यांकनाचा अहवाल हा खोटा असल्याचा माझा आरोप आहे. जर आपण खरोखरच सॉफ्टवेअरमधून जोखीम मुल्यांकनाबाबत अहवाल तयार केला असता तर त्यामध्ये मनुष्य, वन्य प्राणी, झाडे व इतर गोष्टींबाबतचा कायदेशीर अहवाल तयार झाला असता व त्याचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समावेश झाला असता. प्रकल्प प्रवर्तकांना वन्यजीव संबंधीत विभगाकडून ना-हरकत प्रमाणपत्राची गरज असणार आहे. याबाबत देखील प्रकल्प प्रवर्तकांतर्फे फसवणूक करण्यात येत आहे. तसेच प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | |

| | | |
|---|---|---|
| | यांनी याबाबत मा. अध्यक्षांना अवगत करायला पाहिजे होते. प्रशासनाच्या चुकांमुळे स्थानिकांना विपरीत परिणाम भोगावे लागतात. सदर अहवालामध्ये पर्यावरण सल्लागारांच्या तज्ञांच्या मते मोर, घोरपड व कोंबडीने सिसम व कडुनिंबाच्या झाडावर अंडे दिल्याचे नमूद आहे. अशा प्रकारच्या आश्चर्याच्या गोष्टी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नमूद आहे. यांचा अहवाल पूर्णपणे खोटा आहे. वन्य प्राण्याच्या सर्वेक्षणासाठी सावरकर, मानकर व मेश्राम यांना काम देण्यात आल्याचे नमूद आहे. परंतु एकही जिओटॅग्ड छायाचित्र अहवालात जोडलेले नाही. तसेच वन विभागाकडून प्राप्त झालेली परवानगी देखील सोबत जोडलेले नाहीत. | |
| १२) | चॅप्टर क्रं. ९ मध्ये सीएसआर निधीबाबत माहिती जोडलेली आहे. आपण नमूद केलेली कामे ही ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीमधून देखील करण्यात येऊ शकतात. आपण ग्रामपंचायतींकडून बळजबरीने ग्रामपंचायत स्तरावरील कामे तुम्ही करून देणार असे लिहून घेतले. सदर प्रकल्पामुळे १० कि.मी गावे प्रभावित होणार आहेत. परंतु आपण फक्त २ कि.मी परिघातील ४ गावांचे सर्वेक्षण केले आहे. आपणाकडून यामध्ये रू. ७.० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सदर रक्कम एकदाच खर्च करण्यात येईल किंवा वार्षिक करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. आपण २ कि.मी परिघातील फक्त ४ गावांचा अहवाल दिला. त्यामध्ये आणखी गावे जसे की शेनगांव, चांदनीनगर, घुग्घूस, शिदूर, धानोरा व महाकुर्ला इत्यादी गावांचा समावेश होणे अपेक्षित होते. हवेच्या दिशेकडील स्थित गावांचे आपण सर्वेक्षण केलेले नाही. त्यानूसार त्या ग्रामपंचायतींना सीएसआर निधी देणार नाहीत. ज्या गावांना प्रदूषणाचा प्रादुर्भाव होणार आहे त्यांना आपण सीएसआर निधी देणार नाही व ज्या गावांना प्रदूषणाचा प्रादुर्भाव होणार नाही अशा गावांना आपण सीएसआर निधी देणार आहात काय? प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील त्रुटी आपल्या | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, जनसुनावणीदरम्यान सीएसआर निधीच्या उपयोगाबाबत उपस्थित झालेल्या सर्व मागण्यांचा समावेश सीएसआर मध्ये करण्यात येईल. कंपनीतर्फे दर वर्षी एक-एक करून १० कि.मी परिघातील सर्व गावांमध्ये सीएसआर निधीद्वारे विकासकामे करण्यात येईल. सीएसआर निधीचा उपयोग पर्यावरण विषयक मंजूरी प्राप्त झाल्यानंतर बांधकामास सुरूवात झाल्यापासून करण्यात येईल. प्रकल्पामध्ये उत्पादन प्रक्रिया सुरू होण्यापर्यंत १० कि.मी क्षेत्रा जास्तीत जास्त गावांमध्ये विकासकामे करण्याचे कंपनीचे उद्दीष्ट आहे. सुरूवातीला रू. ७.० कोटींची रक्कम पहिल्या ३ वर्षांमध्ये खर्च करावयाची आहे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्या मान्यतेनूसार कंपनीतर्फे संपूर्ण खर्च करण्यात येईल. कंपनीचे उत्पादन सुरू झाल्यानंतर नफ्यानूसार सीएसआर निधीचा सतत खर्च करण्यात येईल. या क्षेत्रातील प्रत्येक गावाकरिता कंपनीतर्फे सीएसआर निधी खर्च करणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | निदर्शनास आणून दिल्या. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांना पुन्हा विनंती आहे की त्यांनी मा. अध्यक्षांना त्यांच्या अधिकाराबाबत अवगत करावे. मा. अध्यक्षांना विनंती आहे की सदर खोट्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाला खारीज करून कंपनीला सुधारित अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात यावे. तसेच सदर जनसुनावणी तहकूब करून सुधारित अहवालानूसार जनसुनावणी परत घेण्यात यावी. | |

## २) श्री. रोशन पचारे, माजी सभापती पंचायत समिती, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मुरसा व बेलसनी येथे येणाऱ्या प्रकल्पाकरिता घेण्यात आलेली जमीनीच्या अकृषक करण्यात आल्याची नोंद कोणत्या ग्रामपंचायतीमध्ये आहे याची माहिती देण्यात यावी. या जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देण्यास प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार असमर्थ दिसत आहेत. ज्या ग्रामपंचायतीकडून अकृषक करून कर भरला आहे त्यची माहिती देण्यात यावी. आमचा या प्रकल्पाला स्पष्ट विरोध आहे. परंतु जर प्रकल्प या गावात आला तर मुरसा व बेलसनी गावातील प्रत्येक नागरीकाला सदर प्रकल्पामध्ये नौकरी देण्यात यावी. प्रकल्पाच्या नजीक मे. लॉयड मेटल्स या उद्योगाची शाळा आहे. सदर प्रकल्पातून होणाऱ्या प्रदूषणाचा विपरीत परिणाम शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणार असल्याने त्याची जबाबदारी प्रशासन घेणार किंवा प्रकल्प प्रवर्तक घेणार हा महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रकल्प प्रवर्तकाने सर्व प्रथम गावकऱ्यांच्या हरकती घ्यायला पाहिजे होती व त्यानंतर जनसुनावणी आयोजित करायला पाहिजे होती. त्यामुळे त्यांना समाधानकारक उत्तरे देण्यास सोपे झाले असते. प्रकल्प प्रवर्तकाने नौकरी किंवा नूकसान भरपाई देणार याबाबत स्पष्टता द्यावी. शाळेच्या विद्यार्थ्यांबाबत मा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकाला सुचित करावे. प्रकल्प प्रवर्तकांना उद्योग उभारणार कसे याबाबत ज्ञान नसल्याचे दिसते. प्रकल्प प्रवर्तकांना या परिसराचा सखोल अभ्यास करण्याबाबत सूचित करण्यात यावे. तसेच सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी ही आमची मागणी आहे. | |

### ३) <u>श्री. सुधाकर बांदूरकर, माजी उप-सरपंच, ग्रामपंचायत घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषण नियंत्रण विभागाने या परिसराची पाहणी केली आहे काय? शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करण्यात आला आहे काय? प्रकल्पाच्या प्रदुषणामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या विपरीत परिणामाची दक्षता घेण्यात आली आहे काय? प्रदूषण विभागाने याबाबत स्पष्टीकरण द्यावे. प्रस्तावित प्लांट मधून हवा, पाणी, आणि ध्वनी प्रदूषण होण्याची शक्यता गंभीर आहे. हा परिसर आधीच औद्योगिक प्रदूषणाने ग्रस्त असल्याने नवीन प्रकल्पामुळे परिस्थिती आणखी बिकट होईल. सदर प्रकल्पामुळे हवेमध्ये धुळ, धूर, $PM_{२.५}$, $PM_{१०}$, कार्बन मोनोऑक्साईड, सल्फर डाऑक्साईड यामुळे लहान मुलांमध्ये श्वसनाचे विकार वाढु शकतात. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वापरण्याची शक्यता आहे. ज्यामुळे स्थानिक शेतकरी, पशुधन आणि ग्रामस्थांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागण्याची शक्ता आहे. मौजा बेलसनी, मुरसा आणि जवळपासच्या गावांमध्ये भूजलाची पातळी आधीच कमी झालेली आहे. केमिकलयुक्त सांडपाण्यामुळे भूजल प्रदूषित होण्याची शक्यता आहे. परिसरातील तलाव व मंदिरावर प्रदूषणाचा विपरीत परिणाम होणार आहे. पर्यावरण सल्लागार यांनी खोटा अहवाल सादर केला आहे. त्याबाबत मा. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांवर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा जसे की ईएसपी, बॅग फिल्टर इत्यादी अद्यावत तंत्रज्ञान असलेले लावण्यात येणार आहे. त्यामुळे प्रदूषण खुप कमी प्रमाणात होईल आणि शाळेच्या विद्यार्थ्यांवर याचा विपरित परिणाम होणार नाही याची खात्री कंपनीतर्फे घेण्यात येईल. त्याचप्रमाणे शाळेतील पायाभूत सुविधांचा विकास कंपनीतर्फे करण्यात येईल. तसेच शाळेमध्ये नियमितपणे सीएसआर अंतर्गत कंपनीतर्फे आरोग्य शिबीरे घेण्यात येतील. कंपनीतर्फे नूकसान झालेल्या शेतकऱ्यांना योग्य ती नूकसान भरपाई देण्यात येणार आहे. वन विभागातर्फे वन्य जीव संवर्धन आराखडा कंपनीला देण्यात येतो. सदर आराखड्याचे पालन करणे बंधनकारक असते. तसेच वन विभागाने आरक्षित करून दिलेल्या रकमेचा वन्यजीव संवर्धनावर खर्च करणे देखील बंधनकारक आहे. परिसरातील ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊनच कंपनी कार्यान्वित होणार आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशची प्रत म.प्र.नि. मंडळाकडे व संबंधित ग्रामपंचायतींना या पूर्वीच सादर करण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आवाजामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व मानसिक आरोग्यावर परिणाम होईल. आजुबाजूच्या परिसरात वनक्षेत्र आणि जैवविविधता आढळते, ज्यामुळे वन्यजीव आणि नैसर्गिक पर्यावरणाचे असंतुलन होऊ शकते. योग्य कचरा व्यवस्थापन न झाल्यास जमीनीचा ऱ्हास व पर्यावरणीय होनी होऊ शकते. लहान मुलांवर संभाव्य दुष्परिणाम जसे की श्वसनाचे विविध विकार जसे की दमा, खोकला, सर्दी, न्युमोनिया होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रदूषणाच्या विषारी वायुंमुळे विद्यार्थ्यांमध्ये न्युरोलॉजिकल प्रभाव होऊन मेंदूच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. विद्यार्थ्यांची रोग प्रतिकार शक्ती कमी होऊ शकते. सततच्या गोंगाटामुळे मानसिक तणाव व निद्रानाश होऊ शकते. तसेच डोळ्यांचे आजार व त्वचेचे विकार होऊ शकतात. शाळेच्या परिसरात शांतता, स्वच्छता आणि प्रदूषणमुक्त वातावरण असणे अनिवार्य आहे. लहान मुले हा संवेदनशील घटक असून त्यांच्यावर प्रदूषणाचा दीर्घकालीन गंभीर स्वरूपाचा प्रभाव होणार आहे. स्थानिक लोकसंख्येच्या उपजिवीकेचा मुख्य स्त्रोत शेती असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान होईल. या प्रकल्पामुळे भुसंपादन, विस्थापन, आणि सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो. प्रस्तावित प्रकल्पासाठी पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल अनिवार्यपणे सादर करावा. शाळेच्या २ किमी परिसरात प्रदूषणकारक उद्योगांना परवानगी देणे प्रशासनाने थांबवावे. जनसुनावणी अनिवार्य करावी व स्थानिक पालक व नागरीकांचा सहभाग सुनिश्चित करावा. आरोग्य, शिक्षण व बालविकास विभागाचा संयुक्त अहवाल मागवून त्यावर आधारीत निर्णय घ्यावा. सदर प्रकल्प इतर ठिकाणी हलवण्यात यावा. शाळेच्या सभोवती प्रदूषणमापन करणाऱ्या यंत्रणा लावण्यात याव्या. पर्यापूरक व शुन्य उत्सर्जन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सक्ती करण्यात यावी. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता माझा प्रस्तावित मे. मिलीयन स्टील या प्रकल्पास आक्षेप असून सदर प्रकल्प अन्य ठिकाणी हलवावा ही माझी विनंती आहे. | |

४) **श्री. सतिश अतकरे, बेलसनी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण ग्रामपंचायतींकडून जमीन अकृषक करून घेतली आहे. त्याच्या मोबदल्यात स्थानिकांना नौकरी, शेतकऱ्यांना नूकसान भरपाई, तसेच गाव दत्तक घेण्याबाबत आपली काही योजना आहे काय? जमीन अकृषक करताना ग्रामपंचायतीचा ग्रामसभा घेण्यात आली किंवा याबाबत गावामध्ये दवंडी पिटवून त्याबातची माहिती गावकऱ्यांना दिली काय? जमीन अकृषक करताना ग्रामसभा घेण्यात आली नाही. आजच्या जनसुनावणीबाबत गावांमध्ये दवंडी पिटवून व्यापक प्रसिद्धी करण्यात आली नाही. जमीन बेकायदेशीरपणे अकृषक करण्यात आली असल्याचा आमचा स्थानिकांचा आरोप आहे. बेलसनी गावाला कंपनीने दत्तक घ्यावे. त्याबाबत लेखी आश्वासन द्यावे. कंपनीतर्फे बेलसन गावाला सर्व प्रकारच्या सोई सुविधा मिळाल्या पाहिजे. वायु परिक्षणाच्या तक्त्यामध्ये बेलसनी गावाचा उल्लेख केलेला नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, परिसरातील ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊनच कंपनी कार्यान्वित होणार आहे. ग्रामपंचायतीची परवानगी घेतल्याशिवाय व स्थानिकांना रोजगार दिल्याशिवाय कंपनी कार्यान्वित होऊ शकत नाही. कंपनीतर्फे १० किमी परिघातील प्रकल्पग्रस्त गावातील स्थानिकांना नौकरीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. जनसुनावणीबाबतची जाहीरात दैनिक मराठ वृत्तपत्र नवराष्ट्र व इंग्रजी दैनिक द हितवाद या वृत्तपत्रांमध्ये दि. २६/०४/२०२५ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची प्रत संबंधित ग्रामपंचायतींमध्ये जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर नागरीकांना अभ्यासण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता कंपनीला करणे बंधनकारक आहे. पर्यावरण परवानगी प्राप्त झाल्यानंतर कंपनीतर्फे बेलसनी गावाला दत्तक घेण्यात येईल सीएसआर निधीचा पुरेपूर वापर विकासकामे करण्यासाठी करण्यात येईल. याबाबत कंपनीतर्फे लेखी आश्वासन देण्यात येईल. बेलसनी गावाचा प्रकल्प क्षेत्र म्हणून उल्लेख केलेला आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार केला जाईल व आपल्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. नौकरीमध्ये ८० ते ८५ टक्के स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न कंपनीतर्फे करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, स्थानिकांचे रोजगार, सीएसआर अंतर्गत पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या मुद्यांवर कंपनीने १० किमी परिघातील सर्व ग्रामपंचायतींसोबत चर्चा करून मार्ग काढावा.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणीसमिती यांनी सांगितले की, जनसुनावणीबाबतची जाहीरात दैनिक मराठ वृत्तपत्र नवराष्ट्र व इंग्रजी दैनिक द हितवाद या वृत्तपत्रांमध्ये दि. २६/०४/२०२५ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची प्रत संबंधित ग्रामपंचायतींमध्ये जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर नागरीकांना अभ्यासण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. |

५) <u>श्री. सय्यद अनवर, काँग्रेस, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | म.प्र.नि. मंडळातर्फे नवराष्ट्र या मराठी दैनिकामध्ये जनसुनावणी बाबतची जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती असे सांगण्यात आले. ज्या वृत्तपत्राचे या क्षेत्रामध्ये अस्तित्व नाही अशा वृत्तपत्रामध्ये जनसुनावणीची जाहिरात प्रकाशित करण्यात आली आहे. जनसुनावणीची जाहिरात लोकमत किंवा पुण्यनगरी या मराठी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करायला पाहिजे होती. चंद्रपूर जिल्हा हा भारतातील सर्वात उष्ण जिल्हा आहे. तसेच जगात ४थ्या क्रमांकाचा उष्ण | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जिल्हा आहे. आधीच चंद्रपूर जिल्हा उष्ण असल्याने या नवीन प्रकल्पाची आमच्या जिह्यात गरज काय? चंद्रपूर जिल्हा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. प्रकल्प आले की रोजगार मिळणार असे सांगण्यात येते. परंतु माझ्या जिल्ह्यातील प्रत्येक दुसरा व्यक्ति बेरोजगार का आहे? प्रकल्प येतात व लोकप्रतिनिधींच्या शिफारशी व बेकायदेशीरपणे नागपूर, गोंदिया जिल्ह्यातील युवकांना नौकरी देण्यात येते. प्रकल्प येत असताना सांगण्यात येते की ८०-८५ टक्के स्थानिकांना नौकऱ्या देण्याचे आश्वासन देण्यात येते परंतु प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर स्थानिक या शब्दाची व्याख्या बदलून जाते. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातला माणूस स्थानिक म्हणून संबोधण्यात येते. आपण वायु परिक्षण केलेल्या सर्व गावातील युवकांना १०० टक्के नौकऱ्या द्याव्या. तसेच स्थानिक शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देखील द्यावी. स्थानिकांच्या समस्या सोडविल्या नाहीत तर उद्योग चालु देणार नाही. जनसुनावणीची प्रभावीरीत्या व्यापक प्रसिद्धी करण्यात आली नसल्याने जनसुनावणीचे ठिकाण शोधण्यास स्थानिकांना त्रास झाला. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी स्थानिकांमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याचे विधान करतात. | |

**६) श्री. गणेश वामनराव शेंडे, उप-तालुका प्रमुख, शिवसेना (उबाठा), ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सर्वप्रथम या परिसरातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रकल्प उभारण्याबाबत कौतुक करतो. मौजा बेलसनी, मुरसा, घोनाड, कोची, साखरवाही, घुग्घूस, ताडाली वासीयांचे जीवनमानावर फार मोठा विपरीत परिणाम होणार आहे यात काहीही शंका नाह. पूर्वीच महाराष्ट्रात चंद्रपूर जिल्हा सर्वात जास्त प्रदूषित जिल्हा आहे व त्यात घुग्घूस हे चौथ्या क्रमांकाचे गाव | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | स्टील प्रा. लिमीटेड कंपनी टाकून प्रदूषणात वाढ होणार आहे. वरील प्रकल्पामुळे होणारी महाभयंकर नूकसानीची जबाबदारी ही कंपनीची राहील. प्रदूषणामुळे परिसरातील गाव प्रदूषणाने प्रभावी होणार हे नक्की त्यामुळे मानवी जीवनावरचे शारिरीक व मानसिक संतुलन बिघडेल. प्रदूषणामुळे अनेक प्रकारच्या आजाराने ग्रामस्थ त्रस्त होतील. आज युवा वर्ग कमी हृदयविकारामुळे मृत्यूमुखी पडत आहे ही एक दुर्दैवी बाब आहे. त्यातच ६ किमी अंतरावर आणखी एक उद्योग उभारण्यात येत आहे. त्यामुळे कंपनीने दवाखान्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी. आम्ही शेतकरी असल्यामुळे आमच्याकडे गुरे ढोरे असणार आहे. त्यांचेही जीवनमान बिघडणार यात काही शंका नाही. त्याकरिता पशुवैद्यकीय दवाखान्याची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून द्यावी. आमचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने सदर प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे शेतपिकांचे नूकसान होईल व उत्पन्नात देखील घट होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना एकरी रू. २०,०००/- प्रमाणे नूकसान भरपाई देण्यात यावी. शासनाच्या शासन निर्णयानूसार परिसरातील ८० ते ८५ टक्के नागरीकांना नौकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे. परिसरातील बेरोजगारांना सर्वप्रथम नौकरीची संधी देण्यात यावी. बाहेरच्या व्यक्तिला रोजगारात प्राधान्य देण्यात येऊ नये. कंपनीचे म्हणणे आहे की येथे कुशल कामागारांची कमतरता आहे. कुशल कामगारांची कमतरता असल्यास राजस्थान, हिमाचल, गुजरात या ठिकाणी प्रकल्प कार्यान्वित करावा. कंपनीने अकुशल कामगारांकरिता कौशल्य विकासाचे प्रशिक्षण द्यावे. तसेच कंपनीने स्थानिक विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची शाळा उपलब्ध करून द्यावी. तसेच कंपनीने उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाचा प्रदूषण नियंत्रणासाठी वापर करावा जेणेकरून जिवीतहानी होणार नाही व नूकसान भरपाई देण्याची आवश्यकता येणार नाही. शेतीकरिता पांदण रस्ते कंपनीने तयार करून द्यावे. गामवासीयाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिमहत्त्वाचा आहे. वर्धा नदी लागून | |

| | | |
|---|---|---|
| | आह नदीला पूर येतो आणि पाणी दूषित होते. त्यामुळे जलशुद्धीकरण संच कंपनीने बसवून द्यावे. दरवर्षी ग्रामपंचायतीला सीएसआर फंड देण्यात यावा. एकंदरीत आमचे परिसरातील गावे कंपनीने दत्तक घेऊन गावातील रहिवासी व शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सदर प्रकल्पाला घ्यावी लागणार. | |

### ७) श्री. ईबादुल सिद्दीकी, सामाजिक कार्यकर्ता, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला बंद करण्यात यावे कारण अधिकाऱ्यांनी त्यांची जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली तर प्रदूषण नियंत्रित होणार. प्रकल्पाला विरोध नाही परंतु प्रकल्पामध्ये सर्वप्रथम स्थानिक नागरीकांना नौकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे. त्यांना प्रदूषणापासून वाचविण्यात यावे. आरोग्य विषयक उच्च दर्जाच्या सुविधा मिळाल्या पाहिजे. परिसराला विकसित केले पाहिजे. जगात सर्वात जास्त प्रदूषण चंद्रपूर जिल्ह्यात आहे. उद्योगांना पाणी दिल्यामुळे या जिल्ह्यात भविष्यात पाणी टंचाईची समस्या उद्भवणार आहे. कंपनी ज्या सल्लागारांकडून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करवून घेते ते तज्ञ नसतात. याबाबत श्री. दिपक दिक्षीत यांनी पुरावे सादर केले आहेत. तसेच जनसुनावणीबाबत चुकीचा अहवाल शासनाकडे सादर केला जातो. शासनातर्फे प्रकल्पांना मान्यता देण्यात येते व त्यानंतर कंपनी मनमानी करतात. मे. लॉयड मेटल्स, एसीसी लि., व मे.वे. को. लि. सारख्या उद्योगांमुळे आम्ही आधीच त्रस्त झालेलो आहोत. या प्रकल्पांमधील सीएसआर निधी घुग्घूस शहराकरिता वापरल्यास घुग्घूस शहर पर्यटनाचे केंद्र बनु शकते. घुग्घूस शहरातील नागरीक नासा येथे संशोधन करण्यालायक आहेत विशेषत: घुग्घूस, बेलसनी, शेनगांव, म्हातारदेवी इत्यादी गावातील [illegible] | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

८) **श्री. संजय महादेवराव भोंगळे, भाजपा, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प ज्या सर्व्हे क्रमांकावर स्थित आहे ते कंपनीने कोणकडून विकत घेतलेले आहे. प्रकल्पालगतच्या परिसरातील जमीन प्रदूषित झाल्यास कोणत्या उपाययोजना राबविण्यात येणार? प्रकल्पालगत माझी १६ एकर जमीन आहे. तसेच लॉयड मेटल्स उद्योग उसगांव येथील प्रकल्पालगतच्या जमीनीला कोणत्याही प्रकारची नूकसान भरपाई देत नव्हते. स्थानिक युवकांकरिता शिक्षण, आरोग्य व रोजगाराविषयक कोणत्या उपाययोजना करणार येईल याची माहिती देण्यात यावी. ज्या शेतकऱ्यांची जमीन प्रदूषित होणार आहे अशा शेतकऱ्यांना दरवर्षी मोबदला मिळायला पाहिजे. प्रकल्पामुळे प्रदूषणाच्या पातळीमध्ये वाढ होणार असून धुळीचा प्रादुर्भाव शेतपिकांवर होईल व उत्पन्नामध्ये घट होईल. त्याकरिता करण्यात येणाऱ्य उपाययोजनांची माहिती देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीने सदर जागा विकत घेतली आहे व नमूद सर्व्हे क्रमांकावरच कंपनी कार्यान्वित करण्यात येईल. |

९) **श्री. राजीरेड्डी पोद्दाटुरी, शहराध्यक्ष, घुग्घूस कॉंग्रेस समिती, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाचे आम्ही स्वागत करतो. यापूर्वी मे. लॉयड्स मेटल्स उद्योगामध्ये ८० टक्के स्थानिक नागरीकांना नौकरी देण्याचे वचन देण्यात आले होते. परंतु आजपर्यंत फक्त २० टक्के स्थानिक नागरीकांना नौकरी देण्यात आली व ८० टक्के बाहेरच्या लोकांना नौकरी देण्यात आली. कंपनीने स्थानिकांच्या सर्व मागण्या पूर्ण करणार असल्याचे सांगितले आहे. आम्ही प्रदूषण नियंत्रण मंडळाला मागील ०२ वर्षांमध्ये जवळपास १० निवेदने दिली परंतु एकाही निवेदनाचे उत्तर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त झाले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

माझा प्रशासनाला प्रश्न असा आहे की सदर प्रकल्प प्रायोजित आहे किंवा आयोजित आहे. प्रशासनातर्फे सांगण्यात येते की येथे कोणत्याही प्रकारचा निर्णय होत नाही. तसेच जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांची ईतिवृत्तामध्ये नोंद घेऊन शासनाकडे सादर करण्यात येते. परंतु आमच्या मागण्या खरोखर शासनाकडे सादर होत असल्याबाबत आम्हाला माहिती कशी मिळणार. सदर जनसुनावणीबाबत व्यापक स्तरावर प्रसिद्धी जसे की प्रकल्पग्रस्त प्रत्येक गावामध्ये जनसुनावणीचे फलक का लावण्यात आले नाही? कुठेतरी या प्रकल्पाच्या जनसुनावणीला कमीतकमी आक्षेपांमध्ये संपवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मला देखील औद्योगिक क्षेत्रात कंत्राटदार म्हणून काम करताना २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. श्री. दिक्षीत यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना मी परत उजागर करणार नाही. स्थानिक बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे. ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी या प्रकल्पामध्ये गेल्या आहेत अशांना नौकरी मिळाली पाहिजे. प्रकल्पाच्या अहवालामध्ये ५३० नौकऱ्या उपलब्ध होणार असल्याचे नमूद आहे. ८०-२० टक्क्यानूसार नौकरी ५०-१०० लोकांनाच मिळणार परंतु प्रदूषणाचा परिणाम जवळपास १.० लाख लोकांवर होईल. जगात सर्वात जास्त प्रदूषण व उष्णता घुग्घूस शहरामध्ये आहे. स्थानिकांना निरनिराळ्या आजारांनी त्रस्त केले आहे. कंपनीने स्थानिकांसाठी आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून द्यावी व त्याबाबत लेखी आश्वासन द्यावे. या परिसरामध्ये शेतीकरिता भविष्यात पाणी उपलब्ध होणार नाही व प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे शेतपिकांचे नूकसान देखील होणार आहे. घुग्घूस शहराकरिता लॉयड्स मेटल्स कंपनीने ४ टँकरची सुविधा करून दिलेली आहे. त्याचप्रमाणे मी देखील मागील १२ वर्षांपासून वर्षभर २ टँकरने पाण्याचा पुरवठा करतो परंतु उन्हाळा आला की ४ टँकर पूरवावे लागतात. कंपनी प्रशानाला विनंती आहे की त्यांनी पुढील जनसुनावणीमध्ये पूर्ण तयारी करून यावे. कंपनीने सुविधा पुरविण्याबाबत

| | | |
|---|---|---|
| | प्रयत्न न करता समस्या निकाली काढाव्यात. प्रदूषण नियंत्रण मंडळाला प्रश्न आहे की त्यांनी प्रदूषणग्रस्त शेतकऱ्यांची चौकशी केली आहे काय? प्रदूषण नियंत्रण विभागाच्या कार्यालयात गेले असता प्रादेशिक अधिकारी भेटण्यास टाळाटाळ करतात. प्रदूषणाबाबत चर्चा करण्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने सभा घेतली आहे काय? घुग्घूस शहरामध्ये प्रदूषणाची स्थिती फार वाईट आहे. पूर्वी घुग्घूस शहरामध्ये वायु गुणवत्ता तपासण्याबाबत बऱ्याच मशीन लावण्यात येत होत्या परंतु आजच्या परिस्थितीत एकही मशीन कार्यरत असल्याचे दिसत नाही. कंपनीला विनंती आहे की त्यांनी सीएसआर निधीबाबत संपूर्ण ग्रामस्थांसोबत चर्चा करावी व योग्य त्या उपाययोजना कराव्या. कंपनीला परत एकदा विनंती आहे की त्यांनी आजच्या जनसुनावणीमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांवर पुढील जनसुनावणीमध्ये पूर्ण तयारी करून यावे. | |

**१०) श्री. बंडु वासुदेव बर्डे, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरामध्ये उद्योगांच्या संख्येत वाढ झालेली आहे. परिसरातील फ्युएल्को सायडींगमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. शेतकऱ्यांच्या जमीनी नष्ट होत आहेत. लोकप्रतिनिधी मुंबई मध्ये बसून म्हातारदेवी येथे प्रकल्पास परवानगी देतात परंतु माझी विनंती आहे की त्यांनी प्रकल्प पाठवण्यापेक्षा बॉम्ब टाकून द्यावे जेणेकरून परिसरातील नागरीकांचा मृत्यू होऊन जाणार व प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होणार नाही. लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यातर्फे गावांना परस्पर विकण्यात येत आहे. म्हातारदेवीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूकीचे प्रमाण खूप वाढले असून वाहतूक ठप्प होत आहे परंतु ही समस्या सोडविण्याकरिता लोकप्रतिनिधी पुढाकार घेत नाहीत. उद्योग उभारताना स्थानिक नागरीकांचे मत | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | घेतल्यानंतरच उद्योग उभारले पाहिजे. शेती घेत असताना देखील मध्यस्थाकडून शेती घेतली जाते. जमीन धारकाला माहितीदेखील नसते की त्याची शेती उद्योगासाठी विकल्या जात आहे. उद्योगालगत ३ एकर शेती असेल तर उद्योगाचया प्रदूषणामुळे शेतपिकांचे नूकसान होणार नाही काय? माझी प्रशासनाला विनंती आहे की या क्षेत्रामध्यम आणखी उद्योगांची गरज नसल्याने उद्योगा उभारण्या येऊ नयेत. | |

११) **श्री. संजय विश्वनाथ टिपले, ग्रामपंचायत सदस्य, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने प्रकल्पग्रस्त गावांमध्ये पायाभूत सुविधा पूरविल्या पाहिजे. स्थानिकांना नौकरीमध्ये प्राधान्य दिले पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

१२) **श्री. बृजभूषण पाझारे, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणी आयोजित करताना प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांचा जनसुनावणीच्या कागदपत्रांचा पूर्ण अभ्यास असायला पाहिजे. स्थानिकांच्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांच्याकडून अपेक्षित होते. उद्योग उभारायचा असेल पाण्याचा प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. धानोरा येथे बंधारा बांधण्याचे प्रस्तावित होते. लोकनेते श्री. सुधीरजी मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे बंधाऱ्याची नस्ती नाशिक येथे प्रलंबित आहे. पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे उद्योग बंद करण्याची वेळ येते. वर्धा नदीवर बंधारा बांधल्यामुळे स्थानिकांना फायदा होईल. निर्गुडा नदी नकोडा गावामध्ये वर्धा नदीमध्ये मिसळते. स्थानिकांच्या पाण्याची कमतरता धानोरा बॅरेजमुळे पूर्ण होईल. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, पुढील जनसुनावणीबाबतचा निर्णय मंत्रालय स्तरावर घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पामध्ये ५३० नौकऱ्या उपलब्ध होईल असे सांगितले. परंतु त्या कायमस्वरूपी असणार किंवा कंत्राटी पद्धतीवर असणार याचा खुलासा केलेला नाही. काही उद्योगांमध्ये सुरूवातीला कायमस्वरूपी म्हणून नंतर कंत्राटी पद्धतीवर नौकऱ्या देण्यात येतात. या लालसेपोटी स्थानिक विद्यार्थी आयटीआय, अभियांत्रिकी मध्ये शिक्षण पूर्ण करतात परंतु त्यांना नाईलाजास्तव कंत्राटी पद्धतीने काम करावे लागते. कंपनीने याबाबत स्पष्टीकरण द्यावे. कंपनीने जनसंपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. कंपनी ज्या शेतकऱ्यांची जमीन विकत घेणार आहे त्यांना मोबदल्यात नौकरी मिळणार आहे किंवा कसे याबाबत स्पष्टीकरण मिळालेले नाही. यामध्ये नमूद केले आहे की वर्धा नदी २.५ किमी, सराई नाला ३ किमी, निर्गुडा नदी ७.६९ किमी अंतरावर असल्याचे सांगण्यात आले आहे. याचे खोलीकरण करणे, ना-हरकत प्रमाणपत्र घेणे याबाबत नमूद केले आहे. महाकुर्ला येथे मोठा नाला अस्तित्वात आहे परंतु त्यामध्ये पाणी साठवण्याची सुविधा नाही. त्या नाल्यामध्ये पाणी अडवून पाणी पुरवठा करण्यात यावा. या परिसरामध्ये शाळा जवळच आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी कितीही प्रयत्न केला तरी प्रदूषण होणारच आहे. त्याकरिता कंपनीने अद्यावत तंत्रज्ञान असलेले प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली पाहिजे. तसेच रात्रीच्या वेळी कंपनीचे ईएसपी सुरू ठेवावे लागतील. व्यवस्थित डी-डस्टींग यंत्रणा लावण्यात यावी. प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या डोलाचारचा वापर करून शेतीचे पांदण रस्ते बांधण्याकरिता करण्यात येऊ शकतो किंवा कसे याबाबत संशोधन करणे गरजेचे आहे. परिसरामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. त्यामध्ये स्थानिक मुलांचे इयत्ता दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण होते परंतु पुढील शिक्षणाकरिता कंपनीकडून आयटीआय, अभियांत्रिकी महाविद्यालय प्रस्तावित आहे काय? जेणेकरून सीएसआर निधीमार्फत स्थानिक विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध होईल. प्रकल्पग्रस्त गावांच्या यादीमध्ये फक्त ८ गावांचा | |

उल्लेख आहे. परंतु प्रकल्पामुळे २६ गावे प्रभावित होणार आहेत. त्यामुळे कंपनीने सर्व २६ गावांच्या नावाचा समावेश करणे गरजेचे होते. जेणेकरून सर्व २६ गावांचे सरपंच आश्वासित झाले असते. स्थानिकांचा प्रकल्पाला विरोध नाही. परंतु सदर जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांनी नियोजनबद्ध पद्धतीने हाताळायला कमी पडले. त्यांनी गावकऱ्यांना विश्वासात घेतले नाही. सर्व ग्रामपंचायतींसोबत बैठक घेतली असती तर आज या जनसुनावणीला विरोध झाला नसता. माझी विनंती आहे की कंपनीने उच्च शिक्षीत स्थानिक युवकाला जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्त करावे व स्थानिकांच्या समस्या जाणून घ्याव्या. याच परिसरामध्ये पूर्वीची भाटीया व आताची महामाया कोल वॉशरी उद्योग कार्यरत आहे. सदर कोल वॉशरी उद्योगामध्ये स्थानिकांना नौकरीमध्ये प्राधान्य देण्यात आले नाही. माझी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की त्यांनी सर्व गावातील पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन प्रकल्प कार्यान्वित करावा. तसेच चिमणीतुन निघणाऱ्या धुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसान झाल्यास त्याला देण्यात एकरी येणाऱ्या नूकसान भरपाईची रक्कम नमूद करण्यात यावी. मे. महामाया कंपनीने शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देण्याचे वचन दिले परंतु आजपर्यंत नूकसान भरपाई दिलेली नाही. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच जनसुनावणीबाबत व्यापक स्तरावर प्रसिद्धी करणे देखील गरजेचे होते. अद्यावत स्वरूपाच्या वायु प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बाजारात उपलब्ध आहेत त्याबाबतची सविस्तर माहिती प्रकल्प प्रवर्तकांकडून अपेक्षित होती. प्रकल्पातून निघणाऱ्या आयर्न ओर फाईन्सला कसे अरेस्ट करता येईल याबाबत उपाययोजना करण्यात याव्या. कंपनीमार्फत स्थानिक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीची योजना राबविण्यात यावी जेणेकरून त्यांना पुढील शिक्षण घेणे सोईचे होईल. कंपनीतर्फे वृक्ष लागवड करण्याचे प्रस्तावित आहे परंत त्याचे संगोपन

| | | |
|---|---|---|
| | कसे करता येईल याबाबत माहिती दिलेली नाही. झाडांचे योग्य संगोपन झाल्यास या परिसरात हरीत क्रांती येईल. सदर प्रकल्पाची पुढील जनसुनावणी होणार आहे काय? वर्धा नदीवर बंधाऱ्या बांधण्यात यावा जेणेकरून उद्योगाकरिता पाण्याची कमतरता होणार नाही. | |

१३) **श्री. गौरव अनंतराव गोयणे, बेलसनी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामुळे बेलसनी गाव प्रभावित होणार आहे. जमीन, प्राण्यांवर जास्त परिणाम होणार आहे. त्यामुळे कंपनीने पशुवैद्यकीय दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच स्थानिकांना अनेक आजारांचा सामना करावा लागणार आहे. त्याकरिता देखील कंपनीने दवाखाना उपलब्ध करून द्यावा. पसिरातील ४ गावांसाठी १ असे दवाखाने उपलब्ध करून देण्यात यावे. गावातील अकुशल बेरोजगारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण कंपनीतर्फे देण्यात यावे व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पामध्ये नौकरी देण्यात यावी. कंपनीचे बांधकाम सुरू करताना शेतकऱ्यांसाठी पांदण रस्ते सुरू करण्यात यावे. प्रत्येक घरातील व्यक्तिला कायमस्वरूपी रोजगार मिळणार काय? आता तुम्ही हो म्हणत आहात परंतु प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कंपनीमध्ये प्रवेश नाकारण्यात येईल. शेतकऱ्यांबाबत आपल्या उपाययोजना काय आहेत? आमच्या मागण्या पूर्ण झाल्यास कंपनीला विरोध नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांच्या मागण्या पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. त्याकरिता सर्व गावातील लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून योग्य तोडगा काढण्यात येईल. सदर कंपनीचा एक प्रकल्प नागपूर येथे भंडारा रोड लगत कार्यरत आहे. कंपनीचा तेथील स्थानिकांसोबत कशा प्रकारे व्यवहार करते याबाबत चौकशी करू शकता. सदर प्रकल्प पुढील ४०-५० वर्षांकरिता कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीला सहकार्य करावे जेणेकरून त्यांच्या समस्या सोडविणे सोईचे होईल. सदर प्रकल्प जास्त मोठा नसल्याने कंपनीतर्फे जे शक्य होईल त्या सर्व सुविधा पूरविण्यात येतील असे आश्वासन देतो. कंपनीतर्फे त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबीरे घेण्यात येतात व कर्मचाऱ्यांना तज्ञ बनविण्याचे काम करण्यात येते. आपल्या सर्व मागण्यांबाबत चर्चा करण्यात येईल व योग्य तोडगा काढण्यात येईल. आमच्या प्रकल्पामध्ये कोणलाही प्रवेश बंदी राहणार नाही. तसेच स्थानिकांच्या समस्यांबाबत नेहमी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न कंपनीतर्फे करण्यात येईल. कंपनीतर्फे अद्यावत स्वरूपाच्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करण्यात येतील. तरी |

| | | |
|---|---|---|
| | | देखील शेतकऱ्यांचे किंवा नागरीकांच्या आरोग्याचे नूकसान झाल्यास कंपनीतर्फे बाधित लोकांना योग्य तो मोबदला देण्यात येईल. स्थानिकांच्या सहकार्याविना कोणताही उद्योग कार्यान्वित होऊ शकत नाही. |

### १४) श्री. रमेश बालाजी बुच्चे, माजी सरपंच, ग्रामपंचायत येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामध्ये ३५० टन प्रतिदिन क्षमतेचे ३ किल्न आहे व ३० मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प, फरनेस आणि रोलींग मिल प्रस्तावित आहे. येरूर गावाच्या परिसरामध्ये एकूण ५ उद्योग कार्यरत आहेत त्यामध्ये ४ स्पॉन्ज आयर्न उद्योग व १ वीज निर्मिती प्रकल्पाचा समावेश आहे. या पाचही प्रकल्पांमुळे येरूर गावाचा विकास करण्यात आला आहे. ग्रामपंचायत येरूर व ताडाली येथे एकही विद्यार्थी आयटीआय केलेला दिसणार नाही. माझ्यातर्फे त्या प्रत्येक कंपन्यांमध्ये जवळपास ५० लोक नौकरी करत आहेत. आजच्या परिस्थितीत शेतीच्या कामाकरिता तेथे मनुष्यबळ उपलब्ध नाही. सदर प्रकल्पामुळे परिसराचा विकास होणार आहे. स्थानिकांना नौकऱ्या मिळणार आहेत. परंतु १०० टक्के काम मिळणार याची हमी कोणीच देऊ शकणार नाही. उद्योगाला स्थानिक पातळीवर त्यांच्या मापदंडानूसार मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास कंपनी बाहेरच्या युवकांना नौकरी देणार नाही. बाहेरून आलेला व्यक्ति किमान १ महिना सुट्टीवर जातो व स्थानिक कामगार फक्त १-२ दिवस सुट्टी घेतो व त्यामुळे मनुष्यबळाची कमतरता कंपनीला भासत नाही. कंपनीमुळे या परसिरातील शिक्षीत व अकुशल युवकांचा फायदा होणार आहे. कंपनीमुळे परिसरातील शेतीच्या जमीनींचे दर वाढतील, गावामध्ये लोकसंख्या वाढणार, तसेच अप्रत्यक्ष रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांच्या मागण्या पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. त्याकरिता सर्व गावातील लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून योग्य तोडगा काढण्यात येईल. सदर कंपनीचा एक प्रकल्प नागपूर येथे भंडारा रोड लगत कार्यरत आहे. कंपनीचा तेथील स्थानिकांसोबत कशा प्रकारे व्यवहार करते याबाबत चौकशी करू शकता. सदर प्रकल्प पुढील ४०-५० वर्षांकरिता कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीला सहकार्य करावे जेणेकरून त्यांच्या समस्या सोडविणे सोईचे होईल. सदर प्रकल्प जास्त मोठा नसल्याने कंपनीतर्फे जे शक्य होईल त्या सर्व सुविधा पूरविण्यात येतील असे आश्वासन देतो. कंपनीतर्फे त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबीरे घेण्यात येतात व कर्मचाऱ्यांना तज्ञ बनविण्याचे काम करण्यात येते. आपल्या सर्व मागण्यांबाबत चर्चा करण्यात येईल व योग्य तोडगा काढण्यात येईल. आमच्या प्रकल्पामध्ये कोणलाही प्रवेश बंदी राहणार नाही. तसेच स्थानिकांच्या समस्यांबाबत नेहमी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न कंपनीतर्फे करण्यात येईल. कंपनीतर्फे अद्यावत स्वरूपाच्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करण्यात येतील. तरी |

| | | |
|---|---|---|
| | त्यांच्या गावांमध्ये सुविधा उपलब्ध करून घेऊ शकणार. येरूर गावामध्ये आम्ही गावकऱ्यांनी कंपनीच्या माध्यमातून चांगल्या दर्जाची शाळा उभारली आहे. शासनाचा शासन निर्णय आहे की, शासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यास शिक्षकांची संख्या कमी करण्यात येते. याकरिता आम्ही कंपनीतर्फे दोन शिक्षक नेमून घेतले असून त्यांचे वेतन कंपनीतर्फे देण्यात येते जेणेकरून स्थानिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होत नाही. तसेच मे. धारीवालतर्फे गरीब विद्यार्थ्यांच्या शाळेनंतरच्या शिकवणीकरिता दोन शिक्षक देण्यात आले आहेत. माझी मिलीयन स्टील या कंपनीला विनंती आहे की त्यांनी देखील स्थानिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता, आरोग्याकरिता, शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाबाबत अवगत करण्याकरिता सीएसआर निधीच्या माध्यमातून योग्य ते नियोजन करावे जेणेकरून स्थानिकांना त्याचा फायदा होईल. | आरोग्याचे नूकसान झाल्यास कंपनीतर्फे बाधित लोकांना योग्य तो मोबदला देण्यात येईल. स्थानिकांच्या सहकार्याविना कोणताही उद्योग कार्यान्वित होऊ शकत नाही. |

१५) **श्री. संजय भरत उकीनकर, सरपंच, ग्रामपंचायत सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आमच्या परिसरात एकूण ५ उद्योग कार्यरत आहेत. या पाचही उद्योगांनी सीएसआर निधीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आमच्या ग्रामपंचायतीला ज्यादा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आमच्या गावाचा विकास झाला. कंपन्या आमच्या शेतकऱ्यांसाठी किटनाशके उपलब्ध करून देत आहेत. बेलसनी या गावामध्ये प्रकल्प येत असून त्याचा फायदा होणार आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

१६) **श्री. संजय तिवारी, माजी उप-सरपंच, ग्रामपंचायत घुग्घूस, ता. जि. चंद्रपूरः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मे. मिलीयन स्टील प्रा. लि. हा उद्योगा कोणत्या तालुक्यामध्ये येणार आहे ते स्पष्ट करण्यात यावे. सदर कंपनीच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी संबंधित ग्रामपंचायतीमधील पदाधिकारी तसेच शेतकऱ्यांना विश्वासात घ्यायला पाहिजे होते. प्रकल्प प्रवर्तकांनी असे केले असते तर आज या जनसुनावणीना विरोध नसता झाला. कंपनी कार्यान्वित करताना रोजगार देण्यात येतो. स्थानिक बेरोजगार आयटीआय, अभियांत्रिकी शिकलेले युवक मुलाखतीमध्ये पास झाल्यास त्यांना कुशल कामगार म्हंटले जाते, नापास झाल्यास अकुशल कामगार म्हंटले जाते. कंपनीने स्थानिक युवकांना प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आणि नौकरीमध्ये प्राधान्य दिले तर ते फायद्याचे ठरणार. कंपनीला विनंती आहे की शेतकऱ्यांचे नूकसान होणारर नाही याप्रकारचे नियोजन करण्यात यावे. मे. लॉयड मेटल्सने चांगली शाळा उपलब्ध करून दिली आहे. त्याप्रमाणे आपण देखील या परिसरात चांगली शाळा उपलब्ध करून द्यावी. परिसरातील गावांकरिता आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात ज्यामध्ये किडनी संबंधित आजार, कर्करोग, इत्यादी आजारांवर सीएसआर निधीच्या माध्यमातून खर्च करता येईल. माझे या कंपनीला समर्थन आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी देखील पुढच्या जनसुनावणीमध्ये स्थानिकांचे समाधान करणे शक्य होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर उद्योगाचा काही भाग मुरसा, ता. भद्रावती व काही भाग बेलसनी, ता. चंद्रपूर येथे सुरू होणार आहे. |

१७) **श्री. चंदर अर्जुन तारला, माजी उप-सरपंच, ग्रामपंचायत नकोडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामुळे स्थानिकांना नौकऱ्या मिळतील व परिवार समृद्ध होईल. सदर प्रकल्प कार्यान्वित होत पर्यंत आश्वासन देण्यात येत की प्रत्येकाला नौकरी देण्यात येईल. परंतु प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर नियमांच्या आधारे स्थानिकांना डावालण्यात येते. प्रस्तावित नवीन प्रकल्पाला आमचा विरोध नाही. स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे. प्रदूषणाचे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची काळजी कंपनीने घ्यावी. परिसरातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये वृक्ष लागवड करून परिसरात हरीत पट्टा निर्माण केला पाहिजे. कंपनीने श्री. संजय तिवारी यांनी सूचविल्याप्रमाणे कार्य केले तर कंपनीला आमचे समर्थन आहे. त्यामुळे नागरीकांना शैक्षणिक, आरोग्य विषयक सुविधा व स्थानिकांना नौकऱ्या मिळतील. कंपनीने उपरोक्त नमूद सुविधा पूरविल्यास कंपनीला समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

१८) **श्री. परशुराम निळकंठ लोढे, माजी सरपंच, ग्रामपंचायत बेलसनी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीबाबत व्यापक स्तरावर प्रसिद्धी करण्यात आली नसल्याने गावातील ९९ टक्के नागरीकांना याबाबत माहिती मिळाली नाही ज्यामुळे स्थानिकांना त्यांच्या समस्या मांडता आल्या नाहीत. ही घोडचूक कंपनीने केली किंवा कसे याबाबत चौकशी व्हायला हवी. मला प्रसिद्धी माध्यमातून जनसुनावणीबाबत माहिती मिळाली व त्याबाबत मी गावकऱ्यांना अवगत केले त्यामुळे आज येथे स्थानिक नागरीक उपस्थित झाले. सदर जनसुनावणीच्या ठिकाणी पोहोचण्याकरिता कठीण झाले आहे. सदर | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वर्धा नदीतून पाणी उपसा करण्याचे प्रस्तावित आहे व त्याबाबत संबंधित विभागाकडे अर्ज करण्यात आला आहे. |

जनसुनावणीचा फलक रस्त्याच्या कडेला उभारण्यात आला असता तर नागरीकांना पोहोचणे सोपे झाले असते. वर्धा नदीच्या काठावर बेलसनी गाव स्थित आहे. तसेच नदीच्या काठावर वे.को.लि. चे ओव्हरबर्डन आहे. बेलसनी गावाच्या भरपूर समस्या आहे. त्या समस्यांचे निराकरण करण्यास कोणीही तयार नाही. वे.को.लिचे अधिकारी देखील स्थानिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतात. प्रकल्पाच्या समोर महामाया कोल वॉशरी उद्योग कार्यरत आहे. सदर कोल वॉशरीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर तसेच जनावरांच्या आरोग्यावर व शेतपिकांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. बेलसनी, म्हातारदेवी, मुरसा व घुग्घूस परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषणात वाढ झालेली आहे. परंतु प्रदूषण नियंत्रण विभागाकडून प्रदूषण नियंत्रणाबाबत ठोस पावले करण्यात येत नसल्याचे दिसून येते व त्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. महामाया कोल वॉशरीमुळे परिसरातील शेतीचे नूकसान होत असून सदर कोल वॉशरी प्रशासनातर्फे नूकसान भरपाई देण्यात येत असल्याचे सांगितले जाते. परंतु लाभार्थ्यांबाबत कोणतीच माहिती देण्यात येत नाही. सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिकांना नौकऱ्या मिळतील परंतु प्रदूषणात देखील वाढ होणार आहे. प्रदूषणामुळे जिवीत हानी देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कंपनीच्या कामांमध्ये पारदर्शकता नसल्यामुळे स्थानिकांना प्रकल्पाच्या धोरणाबाबत माहिती मिळत नाही. लोकप्रतिनिधी देखील गावकऱ्यांना प्रकल्पाविषयी पूर्ण माहिती देत नाहीत व गावकऱ्यांचे नूकसान होते. कंपनीने त्यांच्या अधिकाऱ्यांना संबंधित गावांमध्ये पाठवून जनसंपर्क करून प्रकल्पाबाबत माहिती द्यायला पाहिजे. आम्ही प्रकल्पाचा कितीही विरोध केला तरी प्रकल्पास मान्यता मिळणार आहे. प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे स्थानिकांना गंभीर स्वरूपाच्या आजारांचा सामना करावा लागणार आहे. कंपनीने गावकऱ्यांच्या उपचारासाठी गावामध्ये ससज्ज दावाखाना उपलब्ध

47

| | | |
|---|---|---|
| | करून द्यावा. तसेच जनावरांकरिता देखील दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. कंपनीच्या प्रदूषणामुळे जमीनीची पत खालावणार असून उत्पन्नात घट होणार आहे. त्याकरिता कंपनीने एकरी रू. २०,०००/- प्रमाणे स्थानिक शेतकऱ्यांची मदत करावी. स्थानिकांना नौकऱ्यामध्ये प्रथम प्राधान्य देण्यात यावे. वर्धा नदीच्या काठावर वे.को.लि. ने ओव्हरबर्डन टाकल्यामुळे नदीचा प्रवाह अरूंद झाला आहे. प्रशासनाला विनंती आहे की नदीचा प्रवाह सुरळीत करण्यात यावा जेणेकरून आमच्या गावाला पूराचा फटका बसणार नाही. तसेच कंपनीने गावामध्ये जलशुद्धीकरण संच उभारावा जेणेकरून गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे उपलब्ध होईल. उद्योगाला लागणारे पाणी वर्धा नदीतून कुठून उपसा करण्यात येईल याबाबत माहिती देण्यात यावी. कंपनीतर्फे आश्वासनाची पूर्तता करण्यात यावी. कंपनीतर्फे जनसुनावणीदरम्यान आश्वासने देण्यात येतात परंतु त्यांची पूर्तता करण्यास कंपनी नेहमी टाळाटाळ करते. स्थानिकांच्या आपआपसातल्या भांडणांमुळे कंपनीचा फायदा होतो हे ही तितकेच खरे आहे. स्थानिकांच्या समस्यां कंपनीने सोडविले नाहीत तर कंपनीला आमचा विरोध असेल. | |

## १९) श्री. प्रकाश विधाते, बेलसनी, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने दोन ठिकाणाहून पाणी उपसा करण्याकरिता अर्ज केला आहे. कंपनीने दोन एकर जमीन विकत घेतली आहे. त्यापैकी एक एकर जमीनीची विक्री प्रलंबित आहे. प्रकल्पाकरिता पाणी कसे आणणार याची माहिती देण्यात यावी. भूमिगत पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्यास त्याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात येतील याबाबत अहवालामध्ये नमूद करायला पाहिजे. प्रकल्पातून निर्माण होणारे सांडपाणी थेट नदीमध्ये सोडण्यात येणार आहे. नदीचे पाणी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वर्धा नदीतून पाणी उपसा करण्याचे प्रस्तावित आहे व त्याबाबत पाटबंधारे विभागाकडे अर्ज करण्यात आला आहे. पाटबंधारे विभागाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर बोअरवेल लावण्यात येईल व भमिगत पाईपलाईनद्वारे प्रकल्पामध्ये पाणी पुरवठा करण्यात येईल. सदर पाण्याची मुबलक उपलब्धता असल्याचे आमच्या सर्वेक्षणात दिसून आले व नियमाप्रमाणे पाणी |

| | | |
|---|---|---|
| | प्रदूषित होऊ नये याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे. कंपनीतर्फे सांगण्यात येते की प्रक्रियाकृत सांडपाणी नदीमध्ये सोडले जाणार नाही परंतु तसे होत नाही व प्रदूषित पाण्यामुळे नदीमधील जीव जंतु मृत्यूमुखी पडतात. त्यामुळे कंपनीने कोणत्याही प्रकारचे पाणी नदीमध्ये सोडू नये ही आमची मागणी आहे. वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नूकसान झाल्यास त्याबाबत कंपनीतर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात येतील. शेती करताना एक युवकाचा वन्य प्राण्याच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाला आहे. अशी घटना परत घडल्यास कंपनीतर्फे काय उपाययोजना करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. कंपनीतर्फे स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे तसेच दवाखाना उपलब्ध करून देण्यात यावा या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. | पुरवठा करण्यात येईल. सदर प्रकल्पामधून औद्योगिक सांडपाणी नदी/नाल्यांमध्ये सोडले जाणार नाही.<br><br>पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, औद्योगिक सांडपाण्याकरिता प्रकल्पामध्ये औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्यात येईल व निर्माण औद्योगिक सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेमध्ये पुनर्वापर करण्यात येईल. प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याचा जास्तीत जास्त प्रमाणात उत्पादन प्रक्रियेमध्य पुनर्वापर करण्यात येईल व उर्वरित सांडपाण्याचा हरीत पट्टा विकासित करण्याकरिता पुनर्वापर करण्यात येईल. प्रकल्प सर्व प्रदूषण नियंत्रण उपकरणांसाबत चालविण्यात येईल. परंतु तरीही कोणाच्या शेतजमीनीचे किंवा शेतपिकांचे नूकसान झाल्यास कंपनीच्या सीएसआर निधीमधून नूकसान भरपाई देण्यात येईल. कंपनी लेखी स्वरूपाचे आश्वासन देण्यास तयार आहे. स्थानिकांच्या सहभागाशिवाया किंवा सहकार्याशिवाय कंपनी कार्यान्वित होऊ शकत नाही. कंपनी आपल्या मागण्यांचा विचार करून स्थानिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न् करणार असल्याचे लेखी आश्वासन देण्यास देखील तयार आहे. |

२०) **श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | तुमच्या पर्यावरण सल्लागाराने वायु, जल व जमीनीचे चांगल्या प्रकारे बेसलाईन सर्वेक्षण केले आहे. माझी विनंती आहे की, त्यांनी आरोग्य विषयक, शेती विषयक व भूजल पातळी संदर्भात सर्वेक्षण करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | रेनवॉटर हार्वेस्टींग प्रणाली बसवावी जेणेकरून भूजलाची पातळी कमी होणार नाही. परिसरातील गावांमध्ये वृक्षारोपण करावे व रस्त्याच्या कडेला देखील फळ झाडांची लागवण करावी. रोजगारामध्ये स्थानिक सुशिक्षीत युवकांना प्राधान्य द्यावे. तसेच स्थानिकांमध्ये कुशलता वाढविण्याकरिता कौशल्य विकास कार्यक्रम राबवावा. सीएसआर निधीबाबत ग्रामपंचायतींसोबत चर्चा करून विकास कामे करण्यात यावी. स्थानिकांसाठी आरोग्य शिबीरे घेण्यात यावी. गरीबांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा पूरविण्यात यावी. कंपनीने स्थानिकांच्या समस्या सोडवाव्या. | |

## २१) <u>श्री. चिन्नामणी बोग्गा, माजी जिल्हा परिषद सदस्य, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मे. लॉयड्स मेटल्स या उद्योगास माझ्या कारकिर्दीत परवानगी दिली होती. मे. लॉयड्स मेटल्स उद्योगामुळे घुग्घूस शहराची परिस्थिती वाईट झालेली आहे. येथे उपस्थित नागरीकांनी त्यांच्या समस्या उपस्थित केले आहेत. सदर प्रकल्पास आम्ही समर्थन दिले किंवा विरोध केला तरी प्रकल्पास मान्यता मिळणार आहे. बेलसनी, म्हातारदेवी, घुग्घूस शहरातील बेरोजगारांना नौकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे. सद्य:स्थितीत शेतकऱ्यांवर अन्याय होण्याची शक्यता जास्त आहे. शेतकऱ्यांना विनंती आहे की त्यांनी थेट कंपनीसोबत संपर्क साधावा. मध्यस्थाद्वारे कंपनीसोबत संपर्क साधु नये त्यात त्यांचे नूकसान होईल. कंपनीसोबत थेट संपर्क साधल्यास समस्यांचे निराकरण लवकर होईल. प्रकल्प कार्यान्वित करण्यापूर्वी वर्धा नदीवर धानोरा येथे बंधारा बांधण्यात यावा. त्यामुळे बेलसनी गावाच्या पाण्याच्या समस्येचे निराकरण होईल. अन्यथा मे. एसीसी लि., लॉयड्स मेटल, कोळसा खाण व स्थानिक शेतकऱ्यांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागेल. वर्धा नदीला जोडणारे ४ नाले आहेत, | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | त्यामध्ये पाणी नेण्यात यावे जेणेकरून पाण्याची समस्या सोडविणे शक्य होईल. लहान मोठे कॅनल तयार करण्यात यावे जेणेकरून पाण्याची समस्या सोडविणे शक्य होईल. नदीच्या पाण्याला वळवण्यात यावे जेणेकरून पाण्याची टंचाई होणार नाही. जास्तीत जास्त प्रमाणात हरीत पट्टा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात यावी. मे. एसीसी लि., लॉयड्स मेटल्स व वे.को.लि. च्या धुळीच्या प्रदूषणाने आधीच नागरीक त्रस्त आहेत. प्रकल्प प्रवर्तकांनी विनंती आहे की त्यांनी लोकांच्या सहकार्यातून प्रकल्प कार्यान्वित करावा. | |

२२) <u>श्री. मधुसुदन रूंगठा, अध्यक्ष, एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशन, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्व. श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर यांचे आज द्वितीय पुण्यस्मरण आहे. त्या प्रित्यर्थ मा. श्री. शरद पवार, श्री. प्रफुल पटेल यांची उपस्थिती होती. त्यांच्यासोबत विदर्भात रोजगार कसा वाढविला जाईल याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच या क्षेत्रामध्ये मोठे प्रकल्प कशा प्रकार कार्यान्वित करता येईल याबाबत देखील चर्चा करण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती जसे की, लोह खनिज, कोळसा, चुनखडी, डोलोमाईट, तांबा इत्यादी खनिज उपलब्ध आहे. मे. लॉयड मेटल्स उद्योगामुळे परिसराचा विकास होण्यास मदत होणार आहे. मागील २८ वर्षांपासून कंपनीने गडचिरोली येथील उद्योग चालविण्याकरिता संघर्ष केला आहे. खनिज उत्खनन करताना कधी त्यांच्या कामगारांचा मृत्यू झाला तर कधी त्यांच्या वाहनांची जाळपोळ करण्यात आली. परंतु कंपनीने त्यांचे कार्य सुरू ठेवले. आयर्न ओरच्या उपलब्धतेमुळे या क्षेत्रामध्ये औद्योगिकीकरणास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. उद्या मा. गडकरी साहेबांनी ॲडव्हांटेज विदर्भबाबत मला | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ५०-१०० लोकांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीमध्ये विदर्भात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याबाबत चर्चा होणार आहे. म.प्र.नि. मंडळाकडे अपुरे मनुष्यबळ असून त्यांना तीन जिल्हे सांभाळावे लागतात. तसेच या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उद्योग येत असल्याने नागरीकांच्या समस्यांना न्याय देण्यास असमर्थ आहेत. या क्षेत्रातील वाढत्या प्रदूषणाकरिता खाजगी उद्योग जबाबदार नाहीत. मा. सर्वोच्च न्यायालयात महाजेन्को विरोधात आमची याचिका न्यायप्रविष्ट आहे व याबाबत म.प्र.नि. मंडळ अवगत आहे. आमची मागणी आहे की स्थानिक व्यक्तिंना प्रत्येकी रू. १०.० लक्षप्रमाणे नूकसान भरपाई देण्यात यावी. तसेच नागरीकांना पिण्यासाठी अल्कलाईन पाण्याची सुविधा देण्यात यावी. पुढील ३ दिवसांमध्ये संयुक्त समितीद्वारे सदर औष्णिक विद्युत प्रकल्पाची पाहणी करण्यात येणार आहे व प्रदूषणाबाबतचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात येईल. मा. जिल्हाधिकारी यांचे क्षेत्रामध्ये औद्योगिकीकरणास चालना मिळण्याकरिता महत्त्वाचे योगदान आहे. तसेच मा. आ. श्री. सुधीरजी मुनगंटीवार यांचेदेखील मोलाचे योगदान आहे. तसेच मा. आ. श्री. किशोरजी जोरगेवार हे देखील यामध्ये सहभागी झालेले आहेत. ५ दिवस एमआडीसी क्षेत्रात पाण्याचा टंचाई झाली होती. मे. जीएमआर यांच्या सहकार्याने पाण्याची साठवणूक करण्यात आली. त्यामुळे भद्रावती तालुक्यातील गावांना पाण्याचा पुरवठा करण्यात आला. मा. श्री. किशोरजी जोरगेवार यांचेकडे निवेदन देण्यात आले की वर्धा नदीमध्ये धानोरा किंवा वढा येथे जॅकवेल बनविणे गरजेचे आहे कारण त्यामुळे उद्योगांना पूरेसे पाणी पुरविणे शक्य होईल. सद्य:स्थितीत उद्योगांना व शेतकऱ्यांना पाण्याची टंचाईला सामोरे जावे लागत आहे कारण येथील पाणी तेलंगणा येथे वळविण्यात आले आहे. वर्धा नदीच्या काठावर असलेले उद्योग नदीतून पाणी उपसा करत आहेत. औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रदूषणाची समस्या कायम राहणार आहे. स्व. श्री. धानोरकर, श्री. | |

| | | |
|---|---|---|
| | पवर व श्री. गडकरीसोबत चर्चेदरम्यान या ठिकाणच्या कापूस, सोयाबिन, धान व डाळीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यात येत असल्याचे आम्ही सांगितले. तरी येथे विकास का झाला नाही याबाबत त्यांना आश्चर्य झाले. तसेच या क्षेत्रामध्ये वर्षभर पाण्याची उपलब्धता असल्याचे सांगितले. स्थानिक विद्यार्थी शिक्षणाकरिता व नौकरीकरिता मुंबई, पुणे सारख्या मोठ्या शहरांमध्ये जात आहेत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर देखील या क्षेत्राचा विकास झालेला नाही. चीन या देशामध्ये ११७९ दशलक्ष टन इतके स्पॉन्ज आयर्नचे उत्पादन करण्यात येते. भारतामध्ये फक्त १७९ दशलक्ष टन इतके स्पॉन्ज आयर्नचे उत्पादन करण्यात येते. जर भारत देशाला चीन या देशासोबत स्पार्धा करायची आहे तर आणखी मोठ्या प्रमाणात स्टील उद्योग कार्यान्वित झाले पाहिजे. विदर्भाचा विकास विदर्भाचा माणूसच करू शकतो. सदर प्रकलप इतर प्रकल्पांच्या तुलनेत फार लहान आहे. चंद्रपूर येथील सोलार नावाचा उद्योग नागपूरमध्ये सुरू करण्यात आला व त्यांनी तयार केलेल्या क्षेपणास्त्राचा वापर नूकत्याच पार पडलेल्या ऑपरेशन सिंदूर मध्ये करण्यात आला. त्या क्षेपणास्त्राला आज जगभरातून मागणी आहे. या क्षेत्रात उद्योग आल्याशिवाय स्थानिक बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण होऊ शकत नाही. ॲडव्हानटेज चंद्रपूर दरम्यान चंद्रपूरच्या बेरोजगारांना रोजगार देण्याची अट घालण्यात आली होती. आज सर्वात मोठी शोकांतिका आहे की चंद्रपूर मध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध नाही. स्थानिक पातळीवर अपुऱ्या शैक्षणिक सुविधांमुळे स्थानिक प्रतिभवंत विद्यार्थी बाहेर जात आहे. तसेच शेतकरी कर्जबाजारी होत आहे. सन १९८३ मध्ये या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उद्योग आले होते. मी देखील त्यावेळी मुंबईहून येथे आलो होते. त्यावेळी हिंदुस्तान लिव्हरचा कारखाना सुरू होता. मला आशा आहे की बाहेर गेलेले स्थानिक नागरीक परत येतील व या क्षेत्राचा विकास होईल. कंपनीला विनंती आहे की त्यांनी स्थानिकांच्या | |

| | |
|---|---|
| | समस्यांचे चर्चा करून निराकरण करावे. तसेच प्रशासनाने देखील पाण्याची समस्या सोडवावी. | |

२३) **श्री. आशिष माशिरकर, भाजपा, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मे. मिलीयन स्टील उद्योगाने स्थानिक शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. तसेच त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिले पाहिजे. स्थानिकांना नौकरीमध्ये प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे काय याची माहिती देण्यात यावी. प्रकल्पग्रस्त गावांना दत्तक घेणार आहे काय, तसेच दत्तक घेतलेल्या गावांमध्ये पायाभूत सुविधा पूरविण्याबाबत धोरण काय आहे. कंपनीला विनंती आहे की सीएसआर निधीचा नियोजनबद्ध पद्धतीने खर्च करण्यात यावा. फक्त कागदोपत्री सीएसआर निधी खर्च करू नये. या परिसरात भूजलाची पातळी कमी होत असल्याने कंपनीने त्याची खबरदारी घ्यावी. औद्योगिकीकरणामुळे परिसराचा विकास होईल, स्थानिकांना रोजगार मिळेल. तसेच प्रकल्पामध्ये कुशल व अकुशल कामगारांबाबत कंपनीने योग्य धोरण राबवावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार नौकरीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. तसेच अकुशल बेरोजगारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येईल व नौकरी देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त गावांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींसोबत चर्चा करण्यात येईल क्रमाक्रमाने प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्पग्रस्त गावांमध्ये सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. कंपनीतर्फे सीएसआर निधी नियोजनबद्ध पद्धतीने खर्च करण्यात येईल. |

२४) **श्री. एस. चंद्रशेखर, पर्यावरणवादी:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाचे मी स्वागत करतो. प्रकल्पाशेजारी असलेल्या गावांचा विकास करण्यात यावा. कंपनीचा सीएसआर निधी व खनिज निधी परिसरातील गावांकरिता खर्च करण्यात यावा. कंपनीने ८० टक्के स्थानिकांना नौकरीमध्ये प्राधान्य द्यावे. कंपनीतील कामगारांना सुरक्षा उपकरणे देण्यात यावी. उद्योगातुन निर्माण सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्यात यावी. प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची कंपनीने काळजी घ्यावी. | |

**२५) श्री. सुरेंद्र वामनराव झाडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या क्षेत्रात नवीन प्रकल्प आल्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल. तसेच स्थानिक बचत गटांना देखील त्याचा फायदा होईल. म्हातारदेवी हे गाव प्रकल्पापासून १ किमी अंतरावर स्थित आहे. त्यामुळे सर्व प्रथम प्रदूषणाचा त्रास म्हातारदेवी गावाच्या ग्रामस्थांना होईल. गावातील नागरीकांना रोजगार मिळाला तर त्यांचे जीवनमान ऊंचावण्यास मदत होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

**२६) श्री. नामदेव डाहुले, भाजपा, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी प्रस्तावित मे. मिलीयन स्टील या उद्योगाचे मी स्वागत करतो. येथे उपस्थित नागरीकांनी प्रकल्पाविषयी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. एमआयडीसी ताडाली क्षेत्रामध्ये काही उद्योग कार्यरत आहेत व मधल्या काळात उद्योगांची स्थिती फार वाईट झाली होती. तेथील काही उद्योग बंद झाले होते. कारखाने बंद होताच स्थानिकांना कारखान्यांची जाणीव झाली. कारखाने बंद झाल्यानंतर अनेकांवर उपासमारीची वेळ आली. स्थानिक नागरीक त्यांच्या शिफारशी करण्याकरिता आमच्याकडे यायचे परंतु कुठल्याही उद्योगामध्ये अतिरिक्त मनुष्यबळ घेण्याची क्षमता नव्हती. अशा परिस्थितीत ४-५ वर्षे निघून गेली. चंद्रपूरमध्ये भविष्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक होणार आहे. या क्षेत्रात उद्योग | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आले पाहिजे व स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे. स्थानिक शेतकऱ्यांना उद्योगातून होणाऱ्या धुळीच्या उत्सर्जनाचा व वाहतूकीमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा जास्त त्रास होतो. कंपनीने स्थानिकांना प्रदूषणाचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. कंपनीने बेलसनी व मुरसा गावातील सुशिक्षीत बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार उद्योगामध्ये नौकरी देताना प्रथम प्राधान्य द्यावे. तसेच अकुशल बेरोजगारांना कंपनीच्या माध्यमातून कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देता येऊ शकते किंवा कसे याबाबत विचार केला पाहिजे. कंपनीने प्रकल्पग्रस्त गावांना दत्तक घेऊन त्यांना पायाभूत सुविधा पूरवाव्यात. मे. लॉयड्स मेटलस उद्योगाचे हस्तांतरण झाले व त्यांनी स्थानिकांसाठी बऱ्याच प्रकारचे सामाजिक कार्य पूर्ण केले. त्यांनी जवळपासची ११ गावे दत्तक घेतली. त्या उद्योगाने स्थानिक शेतकऱ्यांना शेती विकसित करण्याबाबत शिबीरे आयोजित करून नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. स्थानिक गुणवंत विद्यार्थ्यांना अंदाजे रू. ५०,०००/- ची शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याची माहिती आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी शिकवणीची सुविधा देण्यात आल्याचे समतजे. तसेच परिसरात उच्च दर्जाची शाळा उपलब्ध करून दिली. स्थानिक विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न लॉयड्स मेटल्स कंपनीतर्फे करण्यात येत आहे. आज या प्रस्तावित प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यात येत आहे. भविष्यात कंपनीला परवानगी मिळेल व कंपनी उभारणीचे काम सुरू होईल. कंपनी कार्यान्वित झाल्यानंतर कंपनी कशी आहे हे स्थानिकांना समजणार. प्रकल्पाला स्थानिकांचा विरोध नाही. परंतु गावकऱ्यांना त्यांना गरजेच्या असलेल्या सोई सुविधा मिळाल्या पाहिजे व कंपनीचे धोरण गावकऱ्यांच्या हिताचे असले पाहिजे. स्थानिकांना काम मिळाल्यास कंपनीची प्रशंसा होईल व याचे उदाहरण सर्व परिसरात देण्यात येईल. कंपनी स्थानिकांच्या सर्व मागण्या पूर्ण करती अशी अपेक्षा करतो. एमआयडीसीने काही वर्षांपूर्वी परिसरातील जागा अधिग्रहीत केली असून | |

| | | |
|---|---|---|
| | त्या ठिकाणी आणखी प्रकल्प येणे गरजेचे आहे. प्रकल्पामध्ये ५०० लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळाला तर त्याच्या दुप्पट अप्रत्यक्ष रोजगार स्थानिकांना मिळणार आहे. कंपनीमुळे येथे रहीवाशांच्या संख्येत वाढ होईल व छोटया मोठया व्यवसायांना प्रोत्साहन मिळणार. नवीन प्रकल्प कार्यान्वित झाल्यास नवनविन उपक्रम राबविण्यात येतात, धोरणांची अंमलबजावणी करण्यात येते व त्याचा फायदा स्थानिकांना होतो. तसेच गावे समृध्द् होतात. कंपनी लवकरात लवकर कार्यान्वित झाल्यास स्थानिकांना रोजगार मिळणार, गावांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास होईल. | |

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समीती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सुचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समीती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना, आक्षेप नोंदविल्याबदद्‌ल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ३० सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| (उमाशंकर भादुले)<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समीती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (संजय दे. पाटील)<br>सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समीती तथा प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (डॉ. नितीन रा. व्यवहारे)<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समीती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर |